आकोल्यांतील लोकांस........................१ रु.
बाहेरगांवी टपालहाशिलांसह..........२ रु.
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास......................२ आणे

नोटीशी बद्दल
१० ओळींचे आंत....१ रु
दर ओळीस..........८१०६
दुसरे खेपस..............८१

Town ... ... ... 1 Rs
Mofussil ... ... ... 2 ( With postage
All Subscriptions to be paid in advance
Single copy .......................... 2 as

Advertments
Below 10 lines ... ... 2 Rs
Per line over 10 ... ... 3 as
Repetitions Per line...2 as

REGISTERED No. N. 4

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 7 NOVEMBER 1904 NO 44

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख ७ माहे नोवेंबर सन १९०४ इ अंक ४४.

## नोटीस

नोटीस बेशमी शेखगफूर फिटर मुक्काम डोंगरगड यांसः—

करीमवी जवजे शेखगफूर के तरफसे नोटीस दिया जाताहैके मैं तुह्मारी निकाकी औरत हूं निका हुएबाद मुझे बुरी तौरसे मारपीटकरके घरसे हात पकडकर घरसे निकाल दिया. जिसका अरसा आम चार सालका हुवा तबसे मैं अपनें भाईके पास हूं. आज दिनतक २०० रुपिया कर्जा खानेपिनेका हुआ है. इसलिये इतला देती हूं के इस नोटीसके पानेपर आठ रोजके अंदर कर्जेका फैसला करकर मुझको आपने साथ ले जाव. मैं तुह्मारे साथ आनेको बहुत दिनसे राजी हूं नो कि मैंने तीन नोटिसोंसे आपका इतला देचुकी हूं. अब अगर मुदतके अंदर न आवेंगे तो मैं दुसरा निका करूंगी और तुमसे कर्जेका मैं महर व नोटीसके खर्चेका दावा अदालतसे कर लुगी. ता. २।११।०४ इ.

सही,
करीमन जवजे गफूर फिटसकि ल्हाल
सा. गोंदिया छोटी रेलें.

---

## नोटीस

चिरंजीव रा. मंगलचंद्र व बिजलाल वल्लद परशराम मारवाडी दुकान शेगांव यांस

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आमचीं दुकानें शेगांवची, कोठड्या ४ तुह्माकडेस भाड्यानें आहे त्या दुकानचें भाडे संमत १९६१ कार्तिक शुद्ध १ पासून रुपये ५०१ दुसरा मनुष्य देत आहे तेव्हां जागा खाली करून द्यावी तुह्मांस दुकान ठेवणें असल्यास भाडेचिही आणि भाड्याचें रुपये ५०१ नगदी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत आमचे दुकानी आणून द्यावें. आणि मागील सालचे भाडें ससरासरी।३०० राहिलेले व खातेबाकीचे ३०० तेही आणून द्यावे आणि पावती घ्यावी तसें न कराल तर भाड्याची रक्कम मागील आणि एदील व खातेबाकी या सर्व रकमेस दरमहा दरशेंकडा रुपये २ प्रमाणें व्याज द्यावें लागेल या नोटिशीचा खर्चेही द्यावा कळावें. तारीख १-११-०४ इ.

सही (मारवाडींत)
गणेशदास भिवराज दुकान शेगांव
मालक हरिबक्ष भिवराज द. खु.

---

## नोटीस

नोटीस बेशमी गणपत वा लाहानाजी मयत वारीस यायको इंदरकोर मर्द गणपती व दादा उर्फ फत्तेसींग व भाऊलाल वल्लद गणपती अ. पा. सुपडसींग वल्लद सिवसींग देशमुख राहणार मौजे हिंगणेकारेगाव तालुके खामगांव जिल्हे आकोला यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येतें कीं माझी जिनगी तुमचे जवळ यादवराव गोविंदराव देशमुख यानें तुमचे जवळ गहाण लिहून दिली आहे ती मौजे मजकूर येथील शेत सर्वे नंबर १३६ यांतील पांचवा हिस्सा व शेत सर्वे नंबर १४१ यातील हिस्सा असे तुमचे जवळ गहाण रुपये २२६ वर टेविले आहे त्याची दुप्पट रुपये ४५० आह्मी पोपटलाल परशराम मैयत वारस बायको सेजाबाई दुकान पेठ बाळापूर यांचे दुकानावर टेविले आहेत ते आपण नोटीस पावल्या बरोबर घेऊन जाऊन वरील गहाणाची पावती देणें. वरलिहिले प्रमाणें जर तुह्मी रुपये नेले नाहीं तर नोटीस पावले मिती पासून सदर्हू रुपयाचे व्याज दरमहा दरशेकडा दोन रुपये व्याज तुह्मास द्यावे लागेल कारण आह्मी ते सावकाराचें काढले आहेत दर लिहिलें प्रमाणें जर तुह्मी रुपये नेले नाहीं व कोर्टात फिर्याद वैगेरे केली तर आह्मी तो खर्च देणार नाहीं ही नोटीस लिहून दिली सही ता. १-११-०४

सही
बुलसिंग वल्लद गुमानसिंग देशमुख
रा. हिंगणे कारेगांव द. खु.

---

## नोटीस

ति. गंगा भागीरथी रायजी उर्फ धुरपती मर्द संपत वल्लद नव्हाजी पाटील रहाणार नेर ता० आकोट इसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, आमची वडिलोपार्जीतची शेती आहे त्या पैकीं सर्व्हे नंबर ७टिके खातावाले एकर गुंठे १९०२३ आकार रुपये ३२ यातील ½ हिस्सा आणि स. नं. ७७ एकर गुंठे ३०४१० आकार रुपये ४८ यातील ½ हिस्सा असे दोन्ही नंबरांतील हिस्से वडिलोपार्जीत कमाईचे असून आमचा मयत साक्षात चुलता तुमचा नवरा यांचे हिश्यांत गेले आहेत. आमचा चुलता मयत झाला त्यावेळीं तुमचे समोर व पंचासमोर रोख रुपये ५४ सोन्याची मुदी अडीच तोळ्यांची, बैल १, घर, रोख रुपये ११५ आणि शेती आहे. तुह्मी आतां नवरा करून जाता असें आह्मी ऐकतों तर तुह्मांस या नोटिशीनें कळविले जातें की, तुह्मी जर नवरा करून न जाल तर या सर्व इस्टेटीचा उपभोग तुह्मी घेतला असतां आमची बिलकूल हरकत नाहीं. पण नवरा करून जाल व जाण्याचे अगोदर तुह्मी वरील जंगम इस्टेटीची अफरातफर कराल तर तुमचे पासून ती इस्टेट कोर्टमार्फत भरून घेतली जाईल व तसेंच घर आणि शेत हें तुह्मी कोणास खरेदी, गहाण, पट्यानें दिलें तर तें सर्व बातल समजलें जातील. व तुह्मास तें कोणतेही प्रकारें गहाण, खरेदी व भाडेपट्टे, बक्षीस वैगेरे देण्याचा बिलकूल अधिकार नाहीं. व दिल्यास बातल समजलें जातील शिवाय शेतात जे हल्लीं पीक आहे तेही तुह्मांस कोणतेही प्रकारें अफरातफर करितां येत नाहीं. फक्त आमच्या कुळांत तुह्मी आहां तों पावेतों तुह्मी या सर्व जिनगीचा उपभोग घ्यावा. ही नोटीस दिली सही. ता. ३१।१०।०४ इ०

सही
धनाजी वल्लद मारूती पाटील राहणार नेर तालुके आकोट निशाणी खुद्द हातची रेघ असे.

---

## जाहिरात

खालीं सही करणार याजकडून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, आमचा चुलता नामें रायजी उर्फ धुरपती इजपासून वरील नोटिशींतील स्थावर जंगम इस्टेट कोणी खरेदी, गहाण, बक्षीस, भाडेपट्टा वैगेरे घेऊ नये. घेतल्यास तो दस्तऐवज रद्द समजला जाईल. कळावें ता. ३१।१०।०४ इ०

सही
धनाजी वल्लद मारूती पाटील राहणार नेर तालुका आकोट निशाणी खुद्द केली असें.

---

## नोटीस

रा. रा. हिमतराम नरसिंगदास मारवाडी साहू दुकान कुटासा ता. आकोट यांसः—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं, तुह्मी ह्मणता कीं नारायणराव याचा बाप व्यंकटराव यानें मेल्याचे पूर्वी आमचे वहिखात्यावर मागील खात्यावरून सही करून दिली, तेव्हां त्याचे मुलानें लौकर देण्याचा निकाल लावल्यास ठीक, नाहीं पेक्षां त्याचेवर फिर्याद करून पैसे भरून घेईन. असें तुह्मी लोकापाशीं ह्मणता परंतु हें ह्मणणें तुमचे चुकीचें आहे. माझे बापानें तुमचे दुकानाशीं कोणत्याच प्रकारचा देवघेवीचा व्यवहार केला नाहीं यावद्दल कोणीही साक्ष देईल. मी आणि रामचंद्र चंद्रभान देशमुख असें दोघेजण तुमचे दुकानावर आलों व माझे बापाचे सही विषयीं विचारलें असतां तुह्मी ह्या वेळीं वह्या नाहींत, व मी तुह्माला दाखवीत नाहींत, असें तुह्मी ह्मणालें. यावरून तुमचे मनांत बेमानकी घेऊन आह्मांस गंडा घालण्याचा तुमचा विचार आहे. तुह्मी कोणाजवळूनही त्याचे नांवाची सही करून घेऊन आमचे शिरावर रुपये लादण्याचा विचार तुमचा आहे. हे तुह्मास योग्य नाहीं. माझे बापानें तुमचे जवळ कोणतेच प्रकारची मागणी केली नाहीं. हें मी पक्कें जाणून आहे. तुह्मी ह्मणतां कीं मागील खात्यावरून तुमचे बापानें सही केली, परंतु आह्मी आमचे वहीखाते शोधून पहातां तुमचे नांवाचें आमचे वहीखात्यांत कांहींच जमा नाहींत. परंतु इतर सावकाराचे नांवें जमा आहेत. माझे बापास स्वतः लिहितां येत नव्हतें त्याचे नांवचा सही करणार मी स्वतां असतां तुह्मी विनाकारण फिर्याद कराल तर त्याबद्दल योग्य तजवीज केली जाईल. कळावें. तारीख २।११।१९०४ इ०

सही
नारायणराव वल्लद व्यंकटराव राहणार कुटासा दस्तुर खुद्द.

---

## नोटीस.

बेशमी वामनराव लक्ष्मणराव देशमुख राहणार निंब. ता. बाळापूर पोस्ट निंब.

यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, तुह्मी माझे चिरंजीव आहांत पण हल्लीं माझ्या कह्यांत वागत नसून दुसऱ्या लोकांच्या फंदानें घरांतील जिनगीची अफरातफर करितां तुमच्या गैरवर्तणुकीमुळें माझ्या मनाला फार कष्ट होतात. मी तुह्मांस अनेक वेळां समजुतीच्या गोष्टी सांगितल्या पण तुमच्या मनास कांहींच येत नाहीं असें पाहून नाइलाज होऊन ही जाहीर नोटीस देणें भाग पडलें. या पुढें तुह्मी माझ्या वचनांत वागणार नाहीं किंवा घरांतील चीजवस्त दुसऱ्यास मला न विचारतां द्याल तर मी तुह्माला घरांतून काढून देईन हें लक्ष्यांत ठेवावें. माझ्या मनाला झटका येईल अशी गोष्ट करणें तुह्मासारख्या बरोबरीच्या चिरंजीवास आतां शोभत नाहीं. कळावें ता. ४।११।०४ इसवी.

सही.
लक्ष्मणराव उत्तमराव देशमुख
राहणार निंब दस्तुर खुद्द.

---

## जाहिरात.

तमाम लोकांस या जाहीर लेखानें कळविता कीं माझा मुलगा नामें वामनराव हा सज्ञान आहे परंतु तो माझ्या आज्ञेंत नाहीं. माझ्या स्थावर व जंगम कोणच्याहि इस्टेटी संबंधानें त्याच्याशीं कोणी व्यवहार करूं नये. त्याच्या मालकीची कोणचाहि इस्टेट नाहीं. या उपर जर कोणी त्यापासून कांहीं लेख लिहून घेतला, किंवा त्यास कर्ज दिलें, किंवा त्याशीं कसलाहि व्यवहार केला तर त्याजबद्दल मी किंवा माझी इस्टेट जबाबदार नाहीं. कोणी फसूं नयें ह्मणून जाहीर केलें आहे. कळावें ता. १।४।०४ इसवी.

सही.
लक्ष्मणराव उत्तमराव देशमुख
राहणार निंब दस्तुर खुद्द.

## जाहीर नोटीस

पंढरपूर येथें प्लेग सुरू झाला आहे. व तो हळूहळू वाढत आहे. गांवांतील लोकही बाहेर रहावयास जात आहेत. अशा स्थितींत कार्तिकी यात्रेकरितां येथें येणार लोकांस फारच गैरसोय व धोका आहे. हें सर्वांस कळावें ह्मणून मुद्दाम जाहीर करण्यांत येत आहे.

म्युनिसिपल कचेरी पंढरपूर ता. ३१।१०।०४ — S. B. Sardesai. सेक्रेटरी म्युनिसिपालीटी पंढरपूर.


## पोर्टेबल क्यामेरा

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, बारा दहाचा उत्तम, नवीन व पोर्टेबल असा क्यामेरा विकावयाचा आहे ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा. इच्छा असल्यास फोटोग्राफीही शिकविली जाईल. तारीख ६ माहे नोव्हेंबर सन १९०४ इ०

पत्ताः— रामजी नारोबा दलाल आकोला. (पेठ)


# वऱ्हाडसमाचार

मित्ती आश्विन वद्य ३० शके १८२६

## जाहिरनामा

आमचा हा जाहिरनामा ह्मणजे वर्तमानपत्रांतून दररोज छापल्या जाणाऱ्या शेंकडों नोटिसा व जाहिराती यांच्या वर्गांतला नव्हे आहे. आजचा हा जाहिरनामा ह्मणजे प्रत्यक्ष आपल्या कै. वा. चक्रवर्ती महाराणी साहेबांनीं हिंदुस्थानच्या यच्चावत सर्व लोकां करितां दिलेला होय. ह्याचा जन्म इसवी सन १८५८ मधील नोव्हेंबरच्या पहिल्या तारखेस झाला. त्या वेळच्या त्याच्या गेंडस स्वरूपसौंदर्यावरून लोकांस मोठीच भावी आशा वाटत होती. परंतु अलीकडील विचित्र राजधोरणामुळें त्याचा समुच्छेद होईल अशी भीति वाटूं लागली आहे. त्या काळीं या जाहीरनाम्याचें अत्यंत महत्व गात असत. या जाहीरनाम्यामुळें इंडियांतील सर्व लोकांनीं इंग्लंडचे स्वामित्व कबूल करून त्यांचे ते राजनिष्ठ प्रजाजन झाले आहेत. तसेंच राज्यकर्त्यांनीहि या नव्या प्रजाजनांना मोठ्या प्रेमानें वागविण्याचें आश्वासन दिलेलें आहे. ह्या जाहीरनाम्याचीं सर्व भाषेंत भाषांतरें होऊन मोठमोठ्या दरबारांतून तीं वाचण्यांत आलीं आहेत. शिवाय शाळेंतील मुलांनींहि या जाहीरनाम्यांतील कलमांचें बालकडू लहानपणींच मुद्दाम पाजण्यांत येत असेत. असा हा सर्वश्रुत व सर्व मान्य जाहीरनामा ह्मणजे इंग्लंड व हिंदुस्थान या दोन राष्ट्रांचा एकजीव करणारें महा रसायन होय; या जाहीरनामा ह्मणजे सर्व इंडियन प्रजेच्या हक्कासिरांशी ची बहुमोल सनद आहे; ही राज्यकर्त्यांच्या सामर्थ्ययशाची पताका आहे; हा इंडियांतील राजपुरुषांचा शास्ता आहे आणि इंडियन प्रजेला प्राण देणारें अमृत आहे.

अशा ह्या जाहीरनाम्याचा वाढ दिवस करण्याचें अल्हाबाद येथील लोकांनीं ठरविलें होतें. पण कांहीं अपरिहार्य कारणामुळें त्यांचा हा गोड मनोदय बाजूला पडला. पुढील वर्षापासून तरी ह्या वाढदिवसाचा समारंभ निर्विघ्नपणें साजरा होईल अशी आह्मी आशा करितो. अलाहाबादकरांनीं जो हा विचार सुचविला आहे तो मोठा पसंत आहे. आणि त्याबद्दल आह्मी इकडील लोका तर्फे त्यांचे अभिनंदन करितों. अशा उत्सव प्रसंगांनीं नव्या तरुण होतकरू मंडळीना इंडियाच्या सौख्यसंपन्नतेचे राजमार्ग चांगले दिसूं लागतील ज्या जाहीरनाम्यावरून आपण आपले हक्क ह्मणून राज्यकर्त्यापाशीं मागणी करितो, तो जाहीरनामा एकसारखा आपल्या डोळ्यापुढें असला पाहिजे. त्याच्या त्या मंगल स्मरणांत आपल्या भावी आशा निराशा गोंविल्या आहेत. जो कोणी अधिकृत राजपुरुष या आपल्या हक्कांची पायमल्ली करील, आपल्या प्रिय महाराणी साहेबांच्या वचनांचा विपर्यास करण्याचें धाडस करील आणि अशा प्रकारें इंग्रजी इभ्रतीस डाग लावील त्याचें आपण परिमार्जन केलें पाहिजे.

हा वाढ दिवस ह्मणजे आपणापुढें आणि आपल्या राज्यकर्त्यापुढें मांडून ठेविलेला असा मोठा आरसाच होणार आहे. ह्या आरशांत पाहून आपणांस दरवर्षी आपलीं कृत्यें कसोटीस लावण्यास सांपडतील. राज्यकारभार कोणच्या उन्नत पद्धतीवर चालावयास पाहिजे होता व तो कितपत त्या तत्त्वांना धरून झाला हें त्यांत स्पष्ट दिसेल. आज त्या जाहीरनाम्यास ४० वर्षे होत आलीं पण त्यातील सर्वमान्य तत्त्वांचा राज्यकर्त्यांनीं संपूर्ण अंगिकार केला नाहीं. इतकेंच नाहीं तर एक दोन प्रसंगीं तो जाहीरनामा राज्यकर्त्यांस लागूं नाहीं असा युक्तिवादहि करण्यांत आला होता. सर जेम्स स्टिफन्स साहेबांनीं असेंहि प्रतिपादन केलें होतें कीं, हा जाहीरनामा ह्मणजे राज्यकर्त्यांचा संकटकालाची आपत्ती दूर करण्याचा एक शास्त्रोक्त विधी आहे. या पेक्षां यांत कांहींच राम नाहीं. स्टिफन्स साहेबांच्या या शब्दास खुद्द लॉर्ड रिपन साहेबांनीं ह्या जाहारनाम्याची महती व थोरवी भर दरबारांत विदित केलेला आहे. ते स्पष्ट ह्मणाले कीं, हा जाहीरनामा ह्मणजे कांहीं तहनाम्याचीं कलमें नव्हेत. किंवा राजकारस्थान साधण्यासाठीं करून दिलेला कागद नव्हे. स्टिफन साहबांचे विचार अगदीं चुकीचे होते हें सांगणें माझें कर्तव्यकर्म आहे असें मी समजतों. माझ्या राजाच्या व माझ्या देशाच्या इभ्रतीस ही गोष्ट शोभत नाहीं, आणि तसले चुकीचे विचारच आपल्या राज्याचीं पाळेंमुळें खणून टाकण्यास कारणी भूत होतील. आपलें राज्य, लोकांचा जो आपल्या ठायीं दृढ विश्वास व निष्ठा आहे त्यावर उभारलेलें आहे. तें नुसत्या शिपायांच्या शौर्यावर किंवा तरवारीच्या धारेवर उभारलेलें नव्हे

वरील सुगर्वोक्तीचा अभिमान प्रत्येक इंग्लिश सरदारास वांटल्या वाचून राहणार नाहीं. ज्या शब्दार्थांनीं आपला आणि आपल्या राष्ट्राचा वचनभंग होतो ते शब्द आणि ते अर्थ इंग्रज मनुष्याचें अंतःकरण शस्त्राप्रमाणें टोचीत जातील. तो जगप्रसिद्ध जाहीरनामा व त्याचा उन्नत अर्थ मान्य करणार नाहीं असा मनुष्य विरळा! तो जाहीरनामा ह्मणजे राजपुरुषांनीं वळविण्यासाठीं घालून दिलेला मोठ्या वळणदार अक्षरांचा कित्ता होय. हा कित्ता बाजूला सारून देण्याचें आणि हा जाहीरनामा ह्मणजे यःकश्चित एक खर्डा आहे असें समजण्याचें धाष्टर्य आपल्या लॉर्ड कर्झन साहेबांनीं केलेलें आहे. इतके दिवस त्या जाहीरनाम्यांतील उदात्त राजनीतीचीं तत्वें झुगारून देऊन पूर्वींच्या राजांनीं घालून दिलेला मार्ग कोणी अतिक्रमला नव्हता. परंतु ज्या अर्थीं आतां अशी गोष्ट प्राप्त झाली आहे त्या अर्थी ती पूर्वींची उत्कृष्ट पद्धती पुन्हां प्रचारांत आणण्याचा आपण सर्वांनीं एका जुटीनें प्रयत्न केला पाहिजे. आणि आमचा हा प्रयत्न वार्षिक वाढ दिवसाच्या स्मरणानें ईश्वर सुफलित करो!

## औद्योगिक शिक्षण

देशी कलाकौशल्याचें पुनरुज्जीवन व्हावें आणि नव्या उद्योगकला इंडियांत प्रसृत व्हाव्या या सत्संकल्पानें इंडिया सरकाराकडून कांहीं थोडे पगारी विद्यार्थी बाह्य राष्ट्रीं विद्यार्जनासाठीं पाठविण्यांत येणार आहेत. विद्यार्थ्यांनीं ग्रेटब्रिटन, इतर युरोपिअन राष्ट्रें, किंवा अमेरिका येथील एखाद्या विद्याभुवनांत अभ्यास केला पाहिजे. वरील देशाच्या यादींत जपान देश वगळण्यांत आला आहे ही गोष्ट बरोबर नाहीं. प्रत्येक स्कालरशिप दरसाल १५० पौंडांची असून दोन वर्षें पर्यंत चालविण्यांत येईल. विद्यार्थ्यांचा जाण्या येण्याचा खर्च सरकार देतील. प्रसंग विशेषीं ही १५० पौंडांची स्कालरशिप वाढविण्यांत येईल.

वरील प्रकारची एक स्कालरशिप मध्यप्रांतासाठीं राखून ठेवण्यांत आली आहे. मध्य प्रांताचे डायरेक्टर साहेबांनीं या संबंधानें असें जाहीर केलें आहे कीं, ही स्कालरशिप ज्यांस मिळवावयाची असेल त्यांनीं आपले अर्ज १९०५ च्या मार्च १ ले तारखेच्या आंत धाडले पाहिजेत. विद्यार्थी मध्य प्रांतांतला किंवा वऱ्हाडांतला नेटिव असला पाहिजे आणि ज्याची वसति तीन वर्षें इकडे आहे त्याला या प्रांताचा नेटीव ह्मणतां येईल; त्याला इंग्रजी भाषा चांगली येत असल्या विषयीं किंवा ज्या देशांत विद्याभ्यास करावयाचा असेल तेथील रूढ भाषा चांगली अवगत असल्याविषयीं शरीरप्रकृतीनें दृढ असल्या विषयीं व सद्वर्तनी असल्या विषयीं योग्य माणसाचा दाखला अर्जा सोबत दाखल केला पाहिजे, मध्यप्रांत व वऱ्हाड येथें उपलब्ध असलेल्या औद्योगिक विद्यालयांतून त्या विद्यार्थ्याचा अभ्यास संपूर्ण झालेला असला पाहिजे; आणि त्याची विशिष्ट कलेंतील पारगतती चांगली दृष्टीस पडलेली पाहिजे. विद्यार्थ्याची योग्यता, बुद्धि व ग्राहकशक्ती हीं अवश्य लक्षांत घेतली जातील आणि त्याचा कल कोणत्या उद्योगाकडे विशेष आहे, त्याचें प्राविण्य त्या कलेंत कितपत आहे आणि इंडियांत परत आल्या नंतर त्याच कलाकौशल्याचा उत्कर्ष आपल्या प्रांतांत करण्याकडे त्याची प्रवृत्ति कितपत निश्चित राहील या गोष्टींचा विचार सरकार स्कालरशिप देतांना प्रथम करणार आहे. विद्यार्थ्यानें मिळविलेल्या पदव्या पाहून किंवा त्याची एखादी परीक्षा घेऊन त्याची लायकी ठरवितां येण्यासारखी नाहीं.

मध्य प्रांताच्या सरकाराच्या मनांतून ही स्कालरशिप खाणी संबंधाच्या विद्याभ्यासाकडे प्रथम द्यावयाची आहे मध्य प्रांतांत खाणींचे कारखाने मोठ मोठे निघण्यासारखे आहेत तेव्हां युरोपांत जाऊन खाणीच्या बाजूचीं सर्व शास्त्रें अध्ययन करणारा विद्यार्थी प्रथम पाहिजे आहे. इतर औद्योगिक कलांचा अभ्यास करणारे नकोत असें नाहीं पण खनिज विद्यांस या प्रांतांत अग्रस्थान देण्यांत येणार आहे आणि ह्मणूनच या एका स्कालरशिपीचा उपयोग प्रथमारंभीं खनिजशास्त्रविषयक विद्याभ्यासाकडे करण्यांत यावयाचा आहे. हा खाणीचा धंदा या प्रांतांत असा आहे कीं त्याच्याकडे देशी भांडवल पुष्कळ गुंतण्या सारखें आहे आणि लोकांनींही या उद्योगाकडे अवश्य लक्ष्य पुरविलें पाहिजे. हा खाणीचा उद्योग किंवा असाच दुसरा प्रांतिक उद्योग प्रथम उर्जित दशेला येण्याला अशाच प्रकारचा सूक्ष्म प्रारंभ झाला तरी तो आह्मांस अवश्य पाहिजे. सरकारच्या दृष्टीनें हा प्रयत्न पहिलाच आहे पण आतां आह्मास कळकट आहे कीं स्थानिक सरकार या उद्योगाकडे लोकांची प्रवृत्ती ओढून घेण्यासाठीं हरप्रयत्न करण्यास चुकणार नाहींत. कैलासवासी टाटा यांनीं हा उद्योग चांगला हातीं घेतला होता पण त्यांच्या निधनामुळें सर्व मनोरथ सध्यां विरले आहेत. खाणी संबंधाची विद्या शिकविण्याच्या योजना आमच्या प्रांतांत अवश्य असावयाला पाहिजेत आणि त्या या पुढें सरकार चांगल्या प्रस्थापित करितील तर लोक समूहांवर त्यांचे मोठे उपकार होतील. विद्यादानाचें कर्तव्य सरकारचें आहे आणि या कर्तव्याविषयीं जागरूकता येण्याचीं सुचिन्हें दिसत आहेत; तेव्हां हीं सुलक्षणें भावी यशश्रीच्या पूर्वबाटाच आहेत असें समजून आह्मी खनिज शास्त्राची पाठशाला स्थापण्याविषयीं सरकारापाशीं विनंती करीत आहों.

## शारीरिक शिक्षण

शारीरिक शिक्षणाचे अधुनिक शास्त्रकार राजश्री सँडो साहेब आहेत. ते हल्लीं कलकत्यास गेले आहेत आणि ही इंडियाची सफर करण्याचा त्यांचा हेतु आपल्या शरीर शास्त्राचा प्रसार करावा हा आहे. विद्यार्थ्यांची शरीरयष्टी कशी बनली पाहिजे व त्याची वाढ कसकशी होत गेली पाहिजे ही गोष्ट पुनः पुनः लोकांच्या नजरेस

आणण्याचा त्यांचा मुख्य प्रयत्न आहे. आणि या प्रयत्नाला चांगलें यश येवो असें आम्ही मनापासून इच्छितों. शरीर सदृढ तर मन सदृढ ही गोष्ट आमच्या देशांत पुष्कळदां विसरली जाते. शरीर व मन यांचा परस्पर संबंध अगदीं विलक्षण आहे. आणि त्यांची इतकी समव्याप्ती आहे कीं, एकाची पुष्टी तीच दुसऱ्याची पुष्टी किंवा एकाचा ऱ्हास तोच दुसऱ्याचा ऱ्हास होय. उभयतां शरीर व मन यांची वाढ अशी पाहिजे कीं ती परस्पराच्या अभिवृद्धीला चांगली पोषक झाली पाहिजे. शारीरिक संपदा ही मानसिक संपन्नतेला कारणीभूत होते. मनुष्य उदात्त व गुणवान होण्याला शरीरसंपदा हें मूळचें भांडवल होय. आयुष्याचें कर्तव्य चांगलें उत्कृष्ट बनावतां येण्याला मूळ आधार शरीरबलाचा लागतो. आमच्या नेटीव समाजाचे शारीरिक अवनती फार मोठी झाली आहे पण अशा वेळीं शरीराच्या अभिवृद्धीकडे व जोपासनेकडे पुरेसें लक्ष्य सरकारचें जातच नाहीं असें दिसतें. दारिद्र्यामुळें शरीरानें प्रजाजन दुबळा, हीनशक्ती व पंगु असा बनला आहे, इंग्रजी सुधारणेमुळें आमच्या समाजाच्या शस्त्रास्त्रविद्या नष्ट झाल्या आहेत, इंग्रजी शिक्षणाच्या व सरकारी चाकरीच्या लोभाविष्टतेमुळें मोठासा जनसमूह शरीरानें अगदीं थकलेला आणि मानसिक परिश्रमाच्या भृंगानें अगदीं पोखरून काढलेला असा झाला आहे.

आमच्या लोकांचीं शरीरें पुनः चांगलीं बनविलीं पाहिजेत. शरीराची शक्तिसमृद्धि ह्मणजे आत्मदमन, इच्छाशक्ति, व नैतिक स्थिरता यांची मूळ जननी होय. शरीरसंपत्तीची खरी लालच लागली ह्मणजे मनुष्य दुर्व्यसनी न होतां मोठा ताकतवान होतो व त्याला नीतीचा पंथ धरून चालण्याला त्याच्या अंगीं नैसर्गिक तेजोबल स्फूरण पावते नियमयुक्त दीनचर्या, शांत व निर्मळ मनोवृत्ती व समतोल वर्तन हें महा सद्गुण आंएत आणि शरीराच्या निरोगीपणानें व सदृढपणानें हे महागुण लवकर अंगीं खेळू लागतात. राजश्री सँडो साहेब ह्मणतात कीं, माझ्या पद्धतीनें शरीर चांगलें कमावलें तर भिकारी नाजूकपणा जाऊन चांगला मजबूतपणा येईल. इंडियन लोकांची चिकाटी मोठी बळकट असते. आणि ते जर शरीराच्या वाढीकडे पद्धतशीर लक्ष्य देतील तर इंडियन राष्ट्रवाले सगळ्या जगांत पाहण्या सारखे नमुनेदार लोक बनतील असा राजश्री सँडो यांस मोठा भरंवसा आहे. या नव्या पद्धतीनें शरीर व मन यांचे व्यापार एकदम चालतात आणि दोघांच्या परस्पर मदतीनें सर्व व्यायाम उत्कृष्टपणें होतो. आणि या रितीनें शरीर व मन हीं दोन्ही सुसंस्कृत व सुशिक्षित झालीं ह्मणजे आयुष्यांतील सर्व कार्यमालेंत यशश्री अगदीं सान्निध्यानें वसती करूं लागते.

—

## युद्धकांड

नार्थ सी मध्यें रशियाच्या बाल्टिक आरमारानें इंग्रजी मचव्यांचा जो नाश केला त्या मुळें सर्व इंग्लिश लोक त्वेषानें फणफणून गेले होते. आणि या रागाच्या आवेशांत रशिया आणि इंग्लंड यांच्यामध्यें मोठें युद्धकांड माजतें कीं काय ह्मणून मोठीच भीति वाटत होती. पण ही काळजी आतां दूर झाली आहे. रशिया आणि इंग्लंड यांचें सख्य आहे आणि रशियानें झालेल्या आगळिकीबद्दल नुकसानी भरून देण्याचें कबूल केलें आहे. शिवाय वरील आगळिकीबद्दल कोण दोषी आहे याची चौकशी करून त्यास शिक्षा करण्यासाठीं पारिस किंवा हेग या पैकीं एका ठिकाणीं स्पेशल कमिशन बसणार आहे. आणि या कमिशनमध्यें इंग्लंड, रशिया, अमेरिका, आणि फ्रांस या चार राष्ट्रांचे चार प्रतिनिधी आणि या चौघांनीं पसंत केलेला ५ वा प्रतिनिधी या सर्वांनीं मिळून चौकशी करण्याचें ठरत आहे. येणेंप्रमाणें रशिया आणि इंग्लंड यांनीं आपसांत समजुतीची तडजोड काढून लढाईचा अनिष्ट प्रसंग येऊं दिला नाहीं ही गोष्ट सर्वोत्कृष्ट झाली. नाहीं तर, ह्या लढाईचा समुद्र खवळून याच्या पोटांत किती तरी मनुष्यें व राष्ट्रें यांस जलसमाधी मिळाली असती !

रशियानें जपानाशीं जें युद्ध मांडलें आहे, आणि ज्या युद्धाच्या पोटांतून महाभारती युद्धच उत्पन्न होण्याचा प्रसंग आला होता, तें युद्ध, ह्या मोठ्या युद्धाची गोष्ट ऐकून जणु काय भीतीनें बंद पडल्यासारखें दिसतें. म्यांचुरिया मध्यें कोणच्याहि पक्षाची विशेष अशी हालचाल नाहीं. परंतु पोर्टआरथरच्या वेढ्याकडील हकीकत जराशी श्रवणीय आहे. जपानचा भडिमार फार दांडगा होत आहे. आणि त्या मुळें बऱ्याच चकमकी झडत आहेत. जपानी लोक सुरुंग लावितात तें बंद करण्यासाठीं रशियन लोक किल्ल्याबाहेर पडून त्याजवर हल्ले करीत आहेत. एक रशियन कैदी ह्मणतो कीं, किल्ला अगदीं हातघाईवर आला आहे आणि लौकरच जपानच्या हातांत पडेल. आंतमध्यें अन्नपाण्याची फार तूट पडली असून रक्षण करणारें सैन्यहि फार कमी झालें आहे. चांगल्या माऱ्याच्या जागा जपानी लोकांच्या हातीं आल्या आहेत. तरी पण सर्व किल्ला सर होण्यास महिन्यावर दिवस लागतील असा अंदाज आहे.

## वऱ्हाडवृत्त

हवामान— गेल्या दोन चार दिवसांपासून थंडी कडक पडूं लागली आहे. ऋतुमान पालटल्यामुळें किरकोळ दुखणीं चळावलीं आहेत. पिकें चांगलीं जोमदार आहेत पण टोळांच्या पलटणी विशेष सैरावैरा फिरतात ह्मणून मोठी चिंताच आहे.

सुट्टी —दिवाळीच्या सणा निमित्त आह्मी एक हप्ता सुट्टी घेणार आहों तेव्हां पुढील सोमवारचा ह्मणजे १४ नोवेंबर १९०४ चा अंक प्रसिद्ध होणार नाहीं. सालाबादच्या या मामुली सुट्टी नंतर पुढील संवत्सरीं आमची कार्यशक्ती परमेश्वर बहुगुणित करो एवढीच प्रार्थना करून आह्मी आमच्या प्रिय वाचकवृंदाची रजा घेतों.

तारीख २२ आक्टोबर पर्यंतच्या सप्ताहांतील वऱ्हाडांतील प्लेगाचा सौम्यपणा खालील आंकडे दर्शवितीलः—

| जिल्हा | रुग्ण | मृत |
|---|---|---|
| आकोला | ९४ | ६१ |
| उमरावती | ११ | ११ |
| वाशीम | ९ | १ |
| बुलढाणा | ८ | ६ |
| इलिचपूर | १५ | १९ |
| | १३७ | ९८ |

रा. रा. बी. ब्लॅ साहेब असि० कमिशनर यांच्या कोर्टाचा चार्ज रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. एल एल. बी. यांनीं गेल्या बुधवारीं घेतला. उत्कृष्ट कार्यकर्तृत्व व गुणशालीनता हीं पाहूनच यांच्याकडे असिस्टंट कमिशनरचे कोर्टाची संपूर्ण फौजदारी, मुलकी व अबकारी कार्यें सोंपविण्यांत आलीं आहेत.

या वरील योजनेमुळें रा. रा. मुनशी अजिजुद्दीन असि० कमिशनर यांस येथील सिव्हील जज्जचे दिवाणी कोर्टावर नेमण्यांत आलें आहे.

रा. रा. गणेश बापूजी उदगीकर ए० असि० कमिशनर हे रजेवरून परत आल्यामुळें त्यांस वाशिमास नेमण्यांत आलें.

वाशिमचे आफि० ए० असि० कमिशनर रा० रा० लक्ष्मण गोपाळ देशपांडे यांस तहशिलदारीवर केळापुरास पाठविलें.

आणि तेथील आक्टींग तहशिलदार रा० रा० शिवराव देवराव यांस नायब तहशिलदार नेमून आकोल्यास बदललें.

रा. रा. मौलवी हकीमुद्दीन साहेब, वकील आकोला हे लाहोरास चार वर्षांपासून गेले होते ते सध्यां मूर्तिजापुरास चिरंजिवाकडे आले आहेत.

खालील नायब तहशिलदार टोळाच्या स्पेशल ड्यूटीवर असल्यामुळें त्या त्या तहशिलींतील शहानवीस यांस आक्टींग नायब तहशिलदार नेमण्यांत आलेः—

| स्पेशल ड्युटीवर | आक्टिंग नायब तहशिलदार. |
|---|---|
| रा. रा. | रा. रा. |
| रामकृष्ण अमृत, वणी | विष्णु बाजीराव. |
| रुखमाजी मानकोजी धात्रक, | कृष्णाजी भिकाजी देसाई. |
| यवतमाळ. | नरहर गणेश. |
| सय्यद अबदूल कादर दारव्हा. | |

येथील सेशनांत तुरुंगांतील आगीचें प्रकरण चालूं आहे व आणखी कांहीं दिवस हें प्रकरण चालूंच राहील. गोपाळराव टोकेकर यानें अपराध कबूल केल्यामुळें लोकांची जिज्ञासा पुष्कळच कमी झाली आहे.

क्याप्टन डी. ओ. मारिस असि. कमिशनर यांस ऑडिशनल सिव्हील आणि सेशन जज्ज नेमल्या विषयीं आह्मी गतांकीं उल्लेख केला होता पण तो चुकीचा असून त्यांस उमरावतीसच असिस्टंट कमिशनरचे कोर्टावर नेमण्यांत आलें.

रा. रा. सैफुद्दीनखान लालखान आफि. एक्स्ट्रा असि. कमिशनर उमरावती यांस बाळापुरास तहशिलदार नेमण्यांत आलें आणि या पिच्छेहाटीमुळें रा. रा. यशवंत रायभान पाटील आक्टिंग तहशिलदार, बाळापूर यांस आकोट येथें नायब तहशिलदारीवर जावें लागत असून रा. रा. नारायण वामन हारकारे नायब तहशिलदार आकोट यांस आकोल्यास सरकारी स्टँप व्हेंडरच्या जागीं परत येण्याचा हुकूम झाला आहे.

येथील जेलर रा. रा. फिल्डींग यांस चाकरीवरून काढल्यामुळें त्यांच्या जागीं रा. रा. मनमोहनलाल यांस हुशंगाबादेहून बदलण्यांत आलें.

काल सायंकाळीं येथील लायब्ररींत गंगा भागीरथी वेणुबाई नामजोशी यांनीं पुण्याच्या आनाथ बालिकाश्रमा संबंधानें चांगली सरस माहिती सांगितली. सर्व भाषण फारच गोड, अस्खलित व मनोरम झालें. अध्यक्षस्थानीं सौभाग्यवती हिराबाई रुस्तुमजी ह्या विराजमान होत्या. त्यांचेंहि भाषण फार थोड्या पण अती गोड इंग्रजी शब्दांत झालें.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८= |
| सोनें २४।= | चांदी ७४ |
| जवारी ४२-४८ | जवस ७८ |
| गहूं काठे ७०-७२॥ | बनशी ८५-८७॥ |
| सरकी | ९।= |
| मीठ | ३॥। रु. मण |
| चणे | २॥= रु. मण |
| तूप | १०॥ रु. मण |
| तेल | ४॥ रु. मण |

## वर्तमानसार.

झोंप आणणारें गवत— मेक्सिकोच्या कांहीं भागांत एक प्रकारचें गवत उगवतें गुरांनीं तें खाल्लें ह्मणजे तीं बेशुद्ध होतात. हें गवत खाल्ल्यानंतर घोडे उभ्यानेंच झोंपा घेऊं लागतात; गाई आणि मेंढ्या खालीं बसून पाय पसरून पडतात; ज्या जागीं हें गवत दाट उगवलेलें असतें, त्या ठिकाणीं प्रवाशी लोक विसावा घेतात व आपले घोडे चरण्यास सोडतात. त्याचे बरेंचसें पोट भरल्यावर या गवताचा त्यावर परिणाम होऊं लागतो. हे घोडे रस्त्यावरच झोंपीं जातात. एक दोन तासांत घोडे पुनः शुद्धीवर येतात. पण त्यांच्यावर कांहीं वाईट परिणाम झाल्याचें ऐकिवांत नाहीं.

केळीची औषधी—— १ पिसाळलेलें कुत्रें चावलें तर रान केळीचें बीं वांटून जखमेवर लावितात. आणि पोटांत खावयास देतात.

२ मधुमेहाच्या आजारावर केळींचा चांगला उपयोग होतो ह्मणतात.

३ महामारीच्या रोग्यास पिण्यास व गुळणें करण्याला केळीचें पाणी देतात. भाजलेल्या जागेवर केळीचीं पानें लावतात.

**अजब ताजवा**— अमृतसर येथें राहणारा लाला शंभुनाथ नांवाच्या मनुष्यानें एक नवीन ताजवा काढला आहे. या ताजव्यांत सोन्याचा दागिना घातला असतां, त्यांत सोनें किती, तें कोणत्या दराचें व इतर धाधू किती, हें समजतें.

## नोटीस

नोटीस बनाम विठोबा वल्द पेंकू मराठी खाटीक कुऱ्हकार रा. रसुलाबाद ता. आर्वी जिल्हा वर्धा यांसः—

खाली सही करणार इजकडून कळविण्यांत येतें कीं; तुझा माझा विवाह होऊन शहाणे झाल्यानतर मी तुझेजवळ नांदण्यास तयार असतांही जरी तूं मजला चांगल्या रितीनें वागविले नाहींस तरी मुद्धां मी बहुतेक दिवस हालअपेष्टेंत काढिलेंच. तरी अखेर तूं मला जबरीनें घालवून दिलेंस. मी आपले आईबापाचें घरीं येऊन राहिल्ये. सध्यां त्यांच्यानेंमुद्धां मला पोसवत नाहीं. करितां सावकारी कर्ज काढून पोट भरितें. ह्मणून ही नोटीस पावताच ४ दिवसाचें आंत सावकारी कर्ज देऊन माल घेऊन जावें. मी नांदण्यास तयार आहे. मुदतींत आपलेकडून तसें न झाल्यास नोटीस हीच फारकत समजलो जाऊन मी दुसरा वरठाव करीन. अगर पोट भरण्याकरितां नौकरी करीन. त्यांत तुझी हरकत ऐकिली जाणार नाहीं, व या उपर तुझा माझेवर नवरेपणाचा हक्कही राहणार नाहीं कळावें. ता. ४।११।०४ इ०

सही

अन्नपूर्णा जवजे विठोबा खाटीक राहणार वर्धा दस्तुर खुद्द.

## नोटीस

रा. रा. शंकरलाल लखुलाल मारवाडी आगरवाले दुकान अंदुरें तालुके बाळापूर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तारीख १३-७-९६ रोजीं तुह्मास रक्कम ७१६ चें गहाणखत लिहून देऊन माझे मालकीचें शेत अंदुरें येथील सर्व्हे नंबर १६० पैकी व घर तारण दिला त्यांत लहन गहाणाची ही शर्त लिहिली आहे दरम्यान तुह्मास एक वेळा रक्कम वसूल दिली आहे असें असतां तुह्मी एकदम मजला न विचारतां सन १९०१ सालचे पेरणीचे अगोदर सदरील नंबरचे शेत ताब्यांत घेऊन सन १९०१ साला पासून आज पावेतों शेत तुह्मी वहीत करून पीक घेता तेव्हां तुमची फेड वसूल व लागवड शेताची वजा जातां झालें पीक वसुलांत मजरा धरून हिशेब दाखवीत नाहीं याज करितां हा हिशेब ही नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांत दाखवून राहिली रक्कम घ्यावी याप्रमाणें न केल्यास कोर्ट मार्फत या नोटिशीचे व कोर्ट खर्चासुद्धां तुह्मावर फिर्याद करून घेतला जाईल. कळावें ता० ९ माहे नोवेंबर सन १९०४ इसवी.

सही

अनंदराव मुंदर कुळकर्णी राहणार अंदुरें द० खु०

## नोटीस

नोटीस बेशर्मा भुरेखा उर्फ आबदुला वल्लद इसमालखा मु. रा. तेल्हारा तालुके आकोट जिल्हा आकोला. यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आमचा चुलता नामे बापू वल्लद जानजी पोटे यांचा तंटा होता. त्या तट्यांत माझें शेत तुह्मास १००० रुपयांत खरेदीखत रजिष्टर करून दिलें. परंतु भरणा घरीं देवूं अशी आह्मास थाप देवून मजला रुपये दिलें नाहींत. माझे चुलत्याशी दहिगांवचे शेताबद्दल तुह्मी कोर्ट खर्च लावावा व पुरावा वगैरे करावा असें ठरलें असून त्याप्रमाणें तुह्मी कांहींच केलें नाहीं. सर्व पैसे माझे जवळचेच खर्च झाले आहेत. तरी या नोटिशीनें कळवितो कीं सदरहू बातल असलेलें खरेदीखत ८ दिवसांत परत आणून द्यावें. असें करण्यास चुकाल तर मजला फसविलें बद्दल तुह्मावर फौजदारींत फिर्याद केली जाईल. आणि तुह्मी खरेदीखत घेतल्यामुळें माझे पैसा अडक्या संबंधानें जें नुकसान झालें आहे तेंही तुमचे कडून घेतलें जाईल कळावें. ता. २।११।०४ इ०

सही

किसन वल्लद तुकाराम पोटे पाटील रा. खापरखेडे निशाणी हातची खुद्द.

## नोटीस

रा. रा. ब्याहारीलाल रामगोपाळ दुकान कुटासे हल्लीं दुकान टिकमदास सुंदरलाल आकोला. यांसः—

खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुमची हस्त लिखीत नोटीस ता. २९।१०।०४ ची पावली. तुह्मी लिहिले कीं खातेबाकीवरून व गहाण दस्तऐवजावरून घेणे आहे ती बाकी पाठविण्याविषयीं तुह्मास पुष्कळ वेळां तगादा केला ह्मणून लिहिले परंतु तुह्मी त्याविषयीं तगादा मुळींच केला नाहीं. फक्त तुमचे कडून हीच नोटिस आली. या शिवाय तगादा वगैरे कांहीं एक नाहीं तुमची नोटीस आल्यावरून मी लागलीच तुमचे दुकानी येऊन विचारले असतां वह्याही नाहींत व दस्तऐवजही नाहींत असें तुह्मी ह्मणाले तेव्हां बाकी तुह्मास कशावरून द्यावी हे समजत नाहीं. करितां ही नोटीस पावतांच आठ दिवसाचें आंत कुटासे दुकानीं येऊन जे कांहीं गहाणाचे दस्तऐवज व वह्या वगैरे असतील ते आह्मास दाखवाव्या ते पाहिल्या वाचून आमची खातरी पटत नाहीं. जर तुह्मी वह्या अगर आमचे तीर्थरूपाचे हातचे दस्तऐवज वगैरे मला न दाखवितां फिर्याद कराल तर त्याबद्दल मी जबाबदार नाहीं. या नोटिशीचा खर्च तुमचे पासून भरून घेतला जाईल. कळावें. तारीख ३।११।०४ इसवी.

सही.

बापू वल्लद सदाशिव नवले राहणार कुटासें दस्तुर खुद्द.

## जाहिरात

सर्वत्रांस जाहीर करण्यांत येत कीं, बापुराव, देवराव व वासुदेवराव हे तिघे माझे बंधु असून हल्लीं मी त्यांच्यातून विभक्त आहे. ह्मणजे माझा कदमापूर घराण्याकडे दत्तक संबंध आहे. दत्तक संबंधानें जी मला जिनगी मिळाली ती मौजे कदमापूर येथील सर्वे नंबर ४४ व सर्वे नंबर २० यांतील हिस्सा $\frac{१}{३}$ याचा हक्क तारीख २६ मार्च १८९८ रोजीं मिळाला. नतर तारीख ७।४।९८ रोजीं सर्वे नंबर १२३ खरेदी घेतला. पुढें बोंडगांव येथील सर्वे नंबर २६ यांतील $\frac{१}{६}$ व सर्वे नंबर ४९ पैकीं व ९० या नंबरचे हक्क मिळाले. आतां या सर्व जमिनीवर आणि कदमापूर व बोंडगांव येथें असलेल्या जागा घर वगैरेवर पूर्ण मालकी माझी असून वर लिहिलेले माझे बंधुवर्गानी जर कोणास खरेदी गाहाण अगर पट्यानें दिलें तर तो दस्तैवज अजिबात खोटा होईल या पैकीं त्यांनीं स० नं० १२३ हा गणुसा खामगांवकर सावकार याजला दगाबाजीनें गहाण दिला होता. परंतु तो आपसांत देण्याची सोय करून हुकूमनाम्याचा निकाल केला असे. आतां पुढें कोणी फसूं नये म्हणून ही जाहिरात दिली आहे. कळावें. ता० ३।११।०४ इ०

सही

बाबाजी रामचंद्र कुळकर्णी कदमापूर दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशमी— चंद्रभागाबाई जवजे निळकंठराव तर्फे एजंट बाळोबा बाबनाजी वाघ राहणार मौजे गोवरधन परगणें शिरपूर तालुके व जिल्हे वाशीम यांसः—

नोटीस देणार गोपाळराव शिदोजी देशमूख परगणे रिसोड तालुका व जिल्हा वाशीम नोटीस देतों कीं, तुह्मी माझे भावजई नामे चंद्रभागा जवजे निळकंठराव इचे भाऊ असून तिज कडून जनरल एजंट (मुखत्यारपत्र करून) झाले आहांत. मी आणि ती एकत्र राहात आहों असें असतां तुह्मी आमची असलेली वडिलोपार्जित स्थावर जंगम वतन वगैरे आदि करून इस्टेटीची एजंट या नात्यानें. गैर व्यवस्था करून मजला बुडवावे व माझे संमती शिवाय भावजईनें वागावे, बेबनाव राहावा आणि तिने तुमचा अगर तुमचे आप्तवर्गाचा मुलगा दत्तक घ्यावा. असा विचार करीत आहात. हें करणें तुह्मास योग्य दिसत नाहीं. माझे नुकसान होऊन मी बुडूं नये या हेतूनें तुह्मास कळविणें भाग झाले करितां नोटिशीनें कळवितो कीं, तुह्मी आमचे सर्व इस्टेटीची, वतनाची वगैरे गहाण, खरेदी किंवा दुसरी कोणतेही प्रकारची व्यवस्था करूं नये. केल्यास ती मजला नाकबूल होऊन मी त्या व्यवस्थेचा कोणते प्रकारे जबाबदार होणार नाहीं. शिवाय तुह्मी केलेली व्यवस्था व त्या व्यवस्थेचे कागद पत्र रद्द करण्यास योग्य कोर्टांत दावा करणे भाग होऊन त्यांस लागलेला खर्च आणि नोटिशीचा खर्च व्यर्थ तुह्मास देणें भाग पडेल कळावें. ता० ३-११-०४ इ०

सही

गोपाळराव सदोजी दस्तुर खुद्द.

## नोटीस

लक्ष्मण त्रिंबक पटवारी आणि सर्वत्र साहुकार व इतर मंडळी कसबे रिसोड. व दुसरे कोणतेही गांव यांसः—

मी खाली सही करणार अशी नोटीस देतो कीं, माझी भावजई नामे चंद्रभागा जवजे निळकंठराव देशमूख यांनीं आपले बंधु बाळोबा बाबनाजी वाघ यांस एजंट नेमिले आहे आणि माझी असलेली वडिलोपार्जीत स्थावर, जंगम, वतन वगैरे इस्टेटिची बेकायदेशीर व्यवस्था करून मजला बुडवावे ह्मणून इरादा करीत आहे असे समजल्यावरून मी सर्वत्र लोकांस कळवितों कीं, खुद्द चंद्रभागाबाई यांनीं स्वतःनें अगर त्याचे एजंट यांनीं माझी असलेली वडिलोपार्जीत इस्टेटीचे गाहाण, खरेदी, किंवा दुसरे कोणतेही प्रकारची व्यवस्था करून घेतल्यास ती मजला कबूल नसून त्याना कोणत्याही तऱ्हेनें देण्याचा हक्क नाहीं तरी कोणीही हा इस्टेट आपली करून घेऊ नये घेतल्यास ती रद्द आहे असें समजावें. कळावें तारीख ४।११।०४ इ.

सही.

गोपाळराव सदोजी देशमुख कसबे रिसवड ता. व जिल्हा वाशीम दस्तुर खुद्द.

## नोटीस

चंद्रभागाबाई जवजे निळकंठराव देशमुख परगणे रिसोड ता. व जिल्हा वाशिम यांसः—

नोटीस देणार गोपाळराव सदोजी देशमुख परगणे रिसोड ता. व जिल्हा वाशीमः—

नोटीस देतों कीं तुह्मी माझे सख्खे वडिल बंधु मयत निळकंठराव याचे कुटुंब असून त्यामुळेंच माझी भावजय आहांत मी व तुह्मी एकत्र ठिकाणींच राहात आहोंत असे असतां तुह्मी आपले भावास एजंट नेमिले आणि वडिलार्जीत असलेली स्थावर, जंगम, वतन वगैरे इस्टेटिची गैरव्यवस्था करून मजला बुडवावे, माझे सम्मती शिवाय वागावे, बेबनाव राहावा- बंधुचा अगर त्यांचे आप्त वर्गांचा मुलगा दत्तक घ्यावा वगैरे पुष्कळ तऱ्हेचे विचार करीत आहात असें समजून आलें आहे. तर हें करणें तुह्मास योग्य दिसत नाहीं मी तुमचा आणि सर्व इस्टेटीचा सांभाळ कर्ता असून तुह्मी गैर व्यवस्था लावण्याचे मनांत आणून मजला तुह्मास असे न करण्याचे कळविणें भाग पडलें आहे करितां मी हेंच कळवितों कीं, तुह्मी स्वतःचे सहीनें अगर एजंट मार्फत वडिलोपार्जीत असलेली इस्टेटीची गहाण अगर खरेदी किंवा दुसरी कोणतेही प्रकारची व्यवस्था करू नये केल्यास तर तिजबद्दल मी योग्य कोर्टांत दावा करून रद्द करवीन व लागलेला खर्च नोटिसीचे खर्चा सुद्धां तुमचे जवळून भरून घेतला जाईल. कळावें. ता० ४।११।०४ इसवी.

सही.

गोपाळराव सदोजी देशमुख दस्तुर खुद्द.

बाहरगावी टपालहाशिलांसह............२ रु.
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत....१ रु
दर ओळीस............८१८६
दुसरे खेपेस.................८१

Mofossil ... ... ... 2 ( With postage
All Subscriptions to be paid in advance
Single copy ......................... 2 as

Advertments
Below 10 lines ... ... 2 Rs
Per line over 10 ... ... 3 as
Repetitions Per line...2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 21 NOVEMBER 1904 NO 45

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २१ माहे नोवेंबर सन १९०४ इ० अंक ४५

### चुकीची दुरुस्ती

ता० २४-१०-०४ इसवी रोजीं वऱ्हाड-सामाचर पत्रकाचे अंकांत छापून प्रसिद्ध झालेल्या व कमेटीनें गांवांत लावलेल्या ता० २०-१०-०४ इसवीचे इंग्रजी व मराठी नोटिसांत म्युनिसिपाल कमेटीचे सेक्रेटरीची सही महमद कियामुद्दीन ऐवजीं महमद निजामुद्दीन अशी चुकून छापली गेली आहे.

किरकोळ दिवाणी छास नंबर १८
मुकदमा नंबर १
१९०४

सन १८९० चा आक्ट ८ कलम ११
अन्वंय नोटीस

विद्यमान रुस्मतुजी फरिदुनजी डिस्ट्रिक्ट. जज्य साहेब बहादूर जिल्हा आकोले यांचे कोर्टांत—

अर्जदार— रामनाथ बैजनाथ सरवंर्या ब्राम्हण राहणार आकोले

अज्ञान— रामप्रसाद देवीदिन राहणार आकोला

अज्ञान— रामप्रसाद देवीदिन राहणार आकोला याचे स्वतःचे किंवा इस्टेटींचे किंवा दोघांचें संरक्षण करण्याकरितां पालन कर्ता नेमण्याविषयींचा अगर ठरविण्याचा अर्ज वरील अर्जदार यानें अज्ञानाचे शरीराचे अगर इस्टेटीचे अगर दोघांचे पालन करण्यास आपणास पालनकर्ता नेमण्याबद्दल अगर ठरविण्याबद्दल अर्ज केल्यावरून सदरहु अर्जाचे चौकशाची तारीख २ माहे दिसेंबर सन १९०४ इ० रोजीं मुकरर केली आहे तरी नोटिशीनें सर्वत्र लोकास कळविण्यांत येतें कीं, अर्जदाराशिवाय जे इतर नातलग आप्तमित्र ज्यास सदरहु अज्ञानाचे बरें व्हावें अशी इच्छा असेल अगर जे अज्ञानाचे शरीराचे अगर इस्टटींचे अगर दोहींचे पालन कर्ता नेमण्याबद्दल अगर ठरविण्याबद्दल इच्छीत असतील त्यांनीं खुद्द या कोर्टांत आमचे समोर आकोले येथें तारीख २ माहे दिसें० सन १९०४ इ० रोजीं हजर व्हावे आणि आपणास पालन कर्ता कां नेमावे व अर्जदारास कां ठरविले जावे ह्याबद्दल जो कांहीं तोंडी अगर लेखी पुरावा असेल तो घेऊन वरील तारखेस हजर व्हावे. आज ता. ३ माहे नोव्हेंबर सन १९०४ इ० रोजीं आमचे सहीनशी व कोर्टाचे शिक्यानिशी ही नोटीस दिली असे.

Rustomji Faridonji
डिस्ट्रिक्ट जज्य अकोला.

### नोटीस

बेशमी सारजी मर्द मारुती धनगर राहणार भांबेरी ता. आकोट पोस्ट मुंडगांव यांसः—

आह्मी खालीं सही करणार या लेखानें जाहीर करितो तेंः- तुमचा नवरा मारुती हा अंबी आणि माणकी यांचा सख्खा भाऊ असून नारायणचा चुलत भाऊ होता. तो गेल्या शिमग्यांत मेला. घरांत तुह्मी एकट्या आहांत व वय फार लहान आहे. तुह्मांस कोणी फूस देऊन फसवील अशी आह्मांस फार भीति आहे. तुह्मी वडिलोपार्जितची जिनगी ह्मणजे मौजे भांबेरी येथील शेत सर्व्हे नंबर २१, ज्याचें खातें नुकतेंच तुमच्या नांवानें झालें आहे तें, शिवाय घर, कोठा आणि इतर बैठगाई वगैरे जंगम मालाची अफरातफर करूं नये तुह्मी जिवंत आहांत तों पर्यंत तुह्मी त्याचा उपभोग घ्यावा. वरील जिनगी तुह्मी कोणास गहाण, खरेदी किंवा बक्षीस देऊं नये. तुमच्या पाठी मागें आमची मालकी आहे. तुमच्या नवऱ्यास किसन काळे याच्या ५० रुपयांपेक्षां जास्त कर्ज नाहीं. तें शेतीवरच कांहीं चीजवस्त न विकतां फेडतां येतें. तुमच्या पोटपाण्यासाठीं इस्टेट पुरी आहे. तुह्मी कर्ज काढूं नये. जों पर्यंत तुह्मी आमच्या घराण्यांत आहांत तोंपर्यंत तुह्मांला कांहीं कमी नाहीं. तुह्मी अज्ञान आहांत व तुह्माला कोणी कांहीं फूस देऊं नये ह्मणून मुद्दाम कळविलें आहे. कळावें. ता. १६।११।०४ इ०

सह्या
१ नारायण बोंद्राजी
१ अंबी मर्द सोनाजी
१ माणकी मर्द गणू
सर्वत्र राहणार भांबेरी
निशाणी—

### जाहिरात

सर्वत्र लोकांस या जाहिर लेखानें कळविलें जातें कीं, सारजी मर्द मारुती धनगर राहणार भांबेरी ता. आकोट ही फार लहान आहे. तिचा नवरा मारुती हा मेला आहे. भांबेरी येथील सर्व्हे नंबर २१ आणि घर, कोठा हीं तिजपासून कोणी कोणी खरेदी, गहाण, किंवा बक्षीस घेऊं नये. तिला विकण्याचा, गहाण ठेवण्याचा किंवा बक्षीस देण्याचा हक्क नाहीं. कोणी फसूं नये ह्मणून ही जाहिरात दिली असे. कळावें. ता. १६।११।०४ इ०

सह्या
१ नारायण वल्लद बोंद्राजी
१ अंबी मर्द सोनाजी
१ माणकी मर्द गणू
सर्वत्र रा. भांबेरी
निशाणी—

### नोटीस

बेशमी विठू वल्लद भवानी वस्ती मामन ऊर्फ तोंगलाबाद ता० दर्यापूर यांसः—

खालीं सह्या करणार नोटीस देतों कीं— तुह्मी आमचे हरी नारायणचे सख्खे चुलते व किसन वल्लद भवानी याचे सख्खे भाऊ आहात व आपण सर्वत्र गेल्या दुष्काळा पर्यंत एकत्र होतो. पुढें दुष्काळामुळें विभक्त झालो. तोंपर्यंत आपण सर्वेजण असलेली जमीन एकत्र वाहत होतो. अलीकडे तुह्मी आह्मांस आमचे हिस्से वाटून देतो देतो असे ह्मणता परंतु देत नाहीं कारितां आह्मी तुह्मांस ता. ९।११।०४ इसवी रोजीं गावांतील आंबादास भट व नामदेव बळिराम यवदेकर व आबाजी रामचंद्र बाळापूरकर व मुकुंद गणोजी सुतार आकोलेकर व पुरुषोत्तम खंडाळेकर यांचे समक्ष शेतीच्या हिश्याबद्दल गोष्ट काढिली असतां तुह्मी आह्मांस साल मजकूरचे पीक निघाले ह्मणजे आज पासून चार महिन्यांनीं तुमचे हिस्से करून देऊं असें कबूल केलें ते मौजे नांदरून ता० दर्यापूर परगणें दहिहांडा येथील शेत

| सर्व्हे नंबर | एकर गुंठे | आकार रु० |
|---|---|---|
| ६८ | २९८२५ | ४१ |
| ६९ | २३०१४ | ३२ |

याचे खातें तुमचे नांवें आहे त्यांत ½ हिस्या. मौजे लामूर ता० दर्यापूर येथील शेत सर्व्हे नंबर १२० एकर गुंठे २९८२६ आकार रु० ४३ याचे खातें तुमचे नांवें असून शेत सालीम.

जमीन सध्यां तुमचे कबजांत आहे ती तुह्मी कोणाला गहाण अगर खरेदी अगर पट्यानी देऊं नये. दिल्यास त्याजबद्दल खर्च जोखीम तुमचेवर आहे व या नोटिशीनें असें कळविलें जाते कीं या पुढें सदरील विठू वल्लद भवानी यांनीं वरील तीन शेतीबद्दल कोणतेही प्रकारचा व्यवहार करूं नये केल्यास त्याची जबाबदारी ज्याची त्याजवर राहील. आमचेवर नाहीं. कळावें. ता० १२।११।०४ इसवी.

सही
१ हरी नारायण दस्तुर खुद्द.
१ किसन वल्लद भवानी
निशाणी खुद्द.
उभयतां राहणार मामन.

### नोटीस

रा. रा. शितारामसा सखारामसा रंगारी मुक्काम फत्तेखेडा यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं सुमारें ९ महिन्यापूर्वीं माझा भाऊ नामे पांडुसा कमळुसा रंगारी दुकान सवडद हा मैय्यत झाला त्याची बायको नामे आश्राई मर्द पांडुसा रहाणार सवडद ही वेडी आहे. तुमचकडे माझे भावाचे १५०० रुपये कर्ज आहे ती रक्कम बुडवावी असा तुमचा प्रयत्न आहे ह्मणून तुह्मी तिला वेडेपणाचे लहरीत फितवून व फसवून तिजकडून दुकानचे कुलमुक्त्यार पत्र घेण्याचा प्रयत्न करीत आहात करितां तुह्मास या नोटिशीनें जाहीर करण्यांत येते कीं जर तुह्मी आमचे भावजई कडून मुक्त्यारपत्र अगर कोणते ही प्रकारचा लेख लिहून घेतला असेल अगर पुढें घ्याल तर तो रद्द व खोटा समजला जाईल व या नोटिशीचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल. कळावें. तारीख १० माहे नोवेंबर सन १९०४ इ०

सही
शिवरामसा कमळुसा रंगारी
राहाणार सवडद प्रगणे
फत्तेखेडा तालुके मेहेकर
निशाणी हातची रेघ.

### जाहिरात

सर्वत्र लोकांस या नोटिशीच्या द्वारे जाहीर करण्यांत येते कीं वरील नोटिशींतील माझी भावजई आश्राई मर्द पांडुसा राहाणार सवडद ईजकडून मुक्त्यार पत्र अगर कोणतेही प्रकारचा लेख कोणी लिहून घेतला असल्यास अगर यापुढें घेतल्यास तो रद्द व खोटा समजला जाईल करितां सर्वत्र लोकांस जाहीर केले आहे. कळावें. तारीख १० माहे नोवेंबर सन १९०४ इ.

सही
शिवरामसा कमळुसा रंगारी
राहाणार सवडद
निशाणी रेघ

### नोटीस

चि० रेणुराव नारायण देशमुख राहाणार बिडूळ व रामराव सदाशिव उटीकर राहाणार वाढवण यांसः—

कळविण्यांत येते कीं, आमचे चि० गोपाळराव व तमाजी बाळकृष्ण राहाणार वाशीम यांचे नावा खालीं तुमचेंही कुलमुक्त्यार पत्रांत नांव लिहिलें असतां आजपर्यंत तुह्मी कोणचे ही काम केलें नसून आतां तुमचेवर आमचा भरंवसा राहिला नाहीं. तरी तुमचे मुक्त्यार पत्रांत असलेले नांव रद्द केलें आहेत तरी तुह्मी सदरील मुक्त्यारपत्राचे आधारे काम करूं नये केल्यास गुन्ह्यास पात्र व्हाल. कळावें. तारीख ९ माहे नोवेंबर सन १९०४ इसवी.

सही
यादवराव आनंदराव देशमूख
बिडूळकर तालुके पुसद
जिल्हा वाशीम.

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन शुद्ध १४ शके १८२६

## मद विना हत्ती

हत्तीला मद नसावा ही गोष्ट हत्तीच्या हत्तीपणाला कमीपणा आणणारी आहे. जी गोष्ट हत्तीची तीच मनुष्याची होय. मनुष्याला वीरश्री जर नाहीं तर तो मनुष्य तरी कसला ! वीरश्री नसलेलीं माणसें हींच आमच्या समाजाचीं अवजारें आहेत हें आह्माला नव्यानें कोणी सांगावयाला नको. पण जेव्हां एखाद्या तशा प्रसंगाचें प्रत्यक्ष दर्शन होतें तेव्हां आपल्या मनाची स्थिती फार विव्हळ व्हावी हा नैसर्गिक मनोधर्म होय.

आमच्यांतला हत्ती अगदीं मदहीन आहे आणि त्याच्या उलट युरोपियनांतील हत्ती मदोत्कर्षानें फार डुलतो व शोभतो इतकेंच नाहीं तर त्या मदाच्या अतिरेकानें त्यांचा तो हत्ती आमच्या सारख्या निर्मद हत्तीला पाया खालीं कसा तुडवितो याचें प्रत्यक्ष उदाहरण नुकतेंच घडलें.

गेल्या गुरुवारीं येथील विद्यालयांत एक मोठा शोचनीय प्रकार घडला. येथें मुंबईच्या कुबेरगृहाची एक शाखा आहे. तिचे मुख्य राजश्री किनिबरो नांवाचे गोरे गृहस्थ आहेत. त्यांच्या कचेरीला लागून ट्रेनिंग कालेजाचें पटांगण आहे तेथें कांहीं विद्यार्थी दुपारच्या सुटीच्या वेळीं खेळत होते. राजश्री किनिबरो यांची तबेत विद्यार्थ्यांच्या गोंगाटामुळें बिघडली ती इतकी कीं, त्यांच्या पित्तानें त्यांस पिसाळून सोडलें. ते लागलींच अस्तन्या सारून हातांत छडी घेऊन लांकडी कठड्या वरून उडून शाळेच्या हद्दींत आले. त्यांनीं तत्काळ दोन विद्यार्थ्यांस चांगला मार दिला. इतक्यांत त्यांच्या समोर ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सिपाल रा. रा. शिवराम हरी गोखले एम. ए. हे आले आणि ते सामोपचारानें हां हूं ह्मणतात तोंच त्यांच्या वरही तोच वेत्रदंड फिरविण्यांत आला. मोठ्या आनंदाची गोष्ट कीं, राजश्री गोखले यांस प्लिहा किंवा यकृत यांचा विकार नसल्यामुळें ते मूर्च्छावश झाले नाहींत; फक्त त्यांना तो वेत गळ्याच्या बाजूनें लागला व त्याचा कांहीं पृष्ठभाग कानाला चाटून खालीं खालीं उतरता गेला. हा मार लहान खरा तरी त्या गोऱ्या हत्तीच्या शक्तिप्रभावामुळें फार जबर लागला व त्याचे ते त्वचेला विद्रूप करणारे वळ डाक्टरालाही दाखवावे लागले व त्यावर औषधोपचार करावा लागला.

एका विद्यार्थ्याचें घंट्याळही छडीनें फोडलें आहे असें कळतें. ट्रेनिंग कालेजाचे विद्यार्थी वयस्क असतात तेव्हां राजश्री गोखले हे एक विद्यार्थी असावेत असा त्या गोऱ्या हत्तीचा पक्का ग्रह असला पाहिजे. नाहीं तर, प्रिन्सिपालासारख्या श्रेष्ठ विद्यागुरुला मारणें ह्मणजे मोठा गुन्हा होतो हे राजश्री किनिबरो ओळखत नसतील असें वाघर्चाचें विधान कोणी करावें बरें ! राजश्री गोखले त्या छडीवाल्या साहेबापाशीं माझ्या विद्यार्थ्यांला कां मारतां ह्मणून पृच्छा करीत होते तेव्हां, पण पहिली छडी लागल्यानंतर, साहेबांना त्यांच्या प्रिन्सिपालपणाचा सुबोध झाला असला पाहिजे.

दररोज कसरत करणाऱ्या इतक्या विद्यार्थ्यां मध्यें किंवा त्यांच्या गुरुश्रेष्ठ प्रिन्सिपालामध्यें त्या छडीचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नसावें हें संभवतच नाहीं. सामर्थ्य आहे पण त्यांची वीरश्री इतकी सुप्त असावी, त्यांचा हतवीपणा इतका ल्यास पोचला असावा व त्यांच्या दीन चेहऱ्यावरील निर्माल्यपणा इतका ओंगळ असावा हें आह्मी पाहतों तेव्हां आमची अधोगती आणि ही आमची तरुण मंडळी आमच्या आशावृक्षाला किती गोड अमृतफळें आणील हें मनांतल्या मनांतच समजलें पाहिजे. शाळेच्या हद्दीच्या बाहेर एका सरकारी अधिकाऱ्याला नाहीं पण खानगी व्यक्तिच्या एजंटाला हांकून देतां आलें नाहीं किंवा त्याची छडी हिसकावून घेतां आली नाहीं ही आमची पराकाष्ठेची पामरता होय.

शाळेंतल्या विद्यार्थ्यांकडे किंवा त्यांच्या मुख्य गुरुकडे तरी बोल कसचा! प्रत्येकानें आपल्यास त्या स्थितींत घालून पाहावें आणि मग मी काय काय तांडव केलें असतें याचा तर्क बांधावा. आमचा हीनपणा व पंगुपणा पाहूनच पिनल कोडामध्यें लार्ड मेकॉले यांनीं स्वसंरक्षणाची कुस्तंकुस्ती मोठ्या उदार तत्वावर कायद्यानें प्रणीत करून ठेविली आहे. पण बचावाचा हक्क आह्माला उत्तरोत्तर नकोसा होत चालला आहे. कायद्यांतील हक्क मृताक्षराप्रमाणें आह्मी निरुपयोगी करून टाकले आहेत.

वरील प्रकारा संबंधानें सरकारदरबार होणार असल्याविषयीं वाटाघाटी व खलबतें चालू आहेत. आमच्या येथील कायद्यांतील नाना फडणीस अशा सार्वजनिक दुःखाच्या गोष्टीला हातभार लावतील अशाविषयीं बाहेरील लोकांच्या आतुरतेला व जिज्ञासेला थोडासा धीर देण्या इतकें आह्मी आश्वासन देतों. कोणी ह्मणतात कीं, राजश्री किनिबरो माफी मागतील आणि त्या बरोबर हा दुःखाचा ढग ओसरून जाईल. नको बापडा ! राजश्री किनिबरो मनुष्यच आहेत व पश्चात्ताप त्यांच्या मनाला शिवला असेल तर ते निःसंशय राजश्री गोखले यांच्या पुढें उभे राहतील आणि छडी मला उलट मारा ह्मणतील; आणि अशा खऱ्या पश्चात्तापापुढें मानधन राजश्री गोखले छडी चालविणार नाहींत अशी साक्ष त्यांची सात्विक वृत्तीच देते. नुसती किरकोळ कागदी माफी राजश्री किनिबरो यांचें मन शुद्ध करील पण त्यांच्यांतला हत्ती चिरे चिरे ह्मणणार नाहीं. हें अधिक स्पष्टतेनें सांगावें असें आह्मांस वाटत नाहीं. ज्यांनीं मार खाल्ला त्यांनाच हक्क माफी देण्याचा आहे. सरकार दरबारापेक्षां माफीवर हें प्रकरण मिटेल तर आह्मी राजश्री किनिबरो यांचें अभिनंदनच करूं. कां कीं, थोड्या वर्षां पूर्वी येथील मुनसिपाल शाळेंतील एका शिक्षकाला एका फार मार खाल्लेल्या मुलाच्या पालकानें शाळेंतच जाऊन हातानेंच मारलें तेव्हां सेशन कोर्टानें असें लिहून ठेविलें आहे कीं, अशा अपराधाला कैदेचीच शिक्षा पाहिजे. आणि या प्रकरणांत तर राजश्री किनिबरो यांनीं हातानें नाहीं तर छडीनें मारलें आहे. मुनसिपाल शाळेंतील सामान्य पगाराच्या शिक्षकाला नव्हे तर सव्वाशे रुपये पगाराच्या प्रिन्सिपालाला मारलें आहे आणि त्या शिवाय मुंबई युनिव्हरसिटी या सर्वोत्तम एम. ए. पदवीवाल्या विनयसंपन्न व शुद्धवृत्ति सद्गृहस्थांस मारल्यामुळें विद्याखात्याचा मोठाच उपमर्द झाला आहे इतकेंच नाहीं तर आमच्या गांवांत ही अशी गोष्ट घडली अशा विषयीं सर्व गांवकरी लोक शरमेनें व लज्जेनें मान खालीं घालून तटस्थ आहेत. अशा स्थितींत परमेश्वर राजश्री किनिबरो यांस नम्रतेचा तरणोपाय सूचवो, आणि अशांतच त्यांची बदली उमरावतीस झाली आहे तेव्हां येथें संपादावयाचा नम्रभाव त्यांस चांगुलपणाला चढवो असें आह्मी मनापासून इच्छितों.

## औद्योगिक शिक्षण

मध्य प्रांतांत या विशिष्ट शिक्षणाच्या शाळा फारच थोड्या आहेत; किंबहुना या शिक्षणाची सोय नाहींच. ह्मटलें तरी चालेल. जबलपुरास इंजिनिअरींग कालेज आहे आणि त्याच्या भरभराटी वरून व उपयुक्तते वरून तें कालेज कालान्तरानें नांवारूपास येण्या सारखें आहे. उमरावतीस जी औद्योगिक शाळा आहे तिचा लाभ यथातथाच आहे व तिचा ऱ्हास चारी दिशांनीं अभिव्यक्त होतो. मिशनरी संस्थांच्या कांहीं औद्योगिक शाळा आहेत पण त्यामधून सामान्य हस्त कौशल्याच्या पुढील शिक्षणाची योजना कांहींच नाहीं. रेल्वे कडील किंवा तशाच इतर कारखान्यांतून शिक्षण देण्याचा परिपाठ घातला पाहिजे. आणि त्या प्रकारच्या शिक्षणाकडे लोकांची प्रवृत्ति अधीक व्हावी ह्मणून कांहीं स्कालरशिपा ठेविल्यास पुष्कळ फायदा होण्याचा संभव आहे. सध्यां आमच्या स्थानिक सरकाराचा विचार दोन संस्था चालू करण्या विषयींचा आहे. पहिली संस्था ह्मणजे नागपुरास स्थापावयाची ' व्हिक्टोरिआ टेक्निकल इनस्टयुट ' होय; आणि उमरावतीस जी इंजिनिअरींग शाळा स्थापण्यांत येईल ती दुसरी संस्था होय. या दोन औद्योगिक शाळा मोठ्या प्रमाणावर होणार आहेत आणि त्यामध्यें आद्योगिक शिक्षणाच्या प्राथमिक पायरीपासून उच्चतम पायरीपर्यंत सर्व प्रकारच्या विद्यादानाच्या सोयी येथें करण्यांत येणार आहेत. नागपूरच्या कलाकौशल्याच्या विद्यामंदिराची भव्य व रमणीय इमारत संपूर्ण होत आली तेथें शेतकी विषयींची एक शाखा व दुसरी शाखा औद्योगिक कलाकौशल्याची अशी दोन शाखा स्थापण्यांत येतील. त्या शिवाय औद्योगिक पदार्थ संग्रहालय व तत्संबंधीं पुस्तकालय अशीं दोन्हीं चालू करावयाचीं आहेत. तेथेंच रसायन शास्त्र शिकविण्यांत येऊन त्या शिक्षणांतील रसायनाचे प्रयोग करण्या साठीं स्वतंत्र कर्मग्रह सर्व उपकरणासह ठेवावयाचें आहे. या व्हिक्टोरिआ इनस्टीट्यूटला सरकारी राजाश्रय जसा आहे तसा लोकांच्या वर्गणीचाही मोठा आश्रय मिळणार आहे. मुख्यतः शेतीच्या कलेची उन्नती चांगली होईल अशा संबंधानें विशेष धोरण ठेवण्यांत यईल. साधारण कला येथें शिकविण्यांत येतीलच. त्या शिवाय शेतकीच्या शिक्षणासाठीं एक स्वतंत्र शेत व एक स्वतंत्र बगीचा असे निराळे सोडण्यांत येणार आहेत. नागपूरची औद्योगिक शाळा व तशीच उमरावतीची शाळा या दोन्ही व्हिक्टोरिआ स्मारक-फंडाच्या वर्गणींतून उभारण्यांत येत आहेत. राजाश्रय यांस मिळणार आहे हें पाहून आह्मांस मोठा आनंद वाटतो. या शाळांतून पहिल्या प्रतीचे हुन्नरवाले व यांत्रिक कलाभिज्ञ निपजतील अशी मोठी उमेद आहे. त्या शिवाय बंगालच्या मदतीनें रेशमी कारखाने मध्य प्रांतांत चालू करण्याचा स्थानिक सरकाराचा विचार आहे. व्हिक्टोरिआ स्मारक-फंडाचा विनियोग अशा औद्योगिक शालागृहाकडे होत आहे आणि तो सरकारी आश्रया खालीं होत आहे ही गोष्ट वाचून वर्गणी देणाऱ्या सभ्य गृहस्थांस परम संतोष वाटेल. लोकांच्या वर्गणीला सरकारी पैशाची मदत मिळत आहे आणि लोकांचा औद्योगिक विद्यादानाचा संकल्प सरकाराच्या हातून चांगल्या सिद्धीला जात आहे ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय.

## कपाशीचें पीक.

कपाशीचें पीक जसें असावें तसें नाहीं. पहिला अंदाजा सर्व चुकला असें दिसतें. प्रथमच्या आशेनें भावी पिकाच्या समृद्धी विषयीं अगदीं वेडावून सोडलें होतें आशा ही मोठी गोडबोली आहे. ती आगमाच्या वेळीं मनुष्याला अगदीं उल्हासित करून सोडते पण कार्यफलाच्या विषयींच्या तिच्या शक्ती फारच अल्पगामी आहेत. आशा मनुष्याला कार्य करावयाला लावते आणि आशेच्या मागून येणारी सिद्धी मात्र मनुष्याच्या कार्यशक्ती अगदीं मोडून टाकून सोडतात. तद्वत् प्रकार कपाशीच्या पिका संबंधानें आहे. या साली प्रथम कपाशीचा जो भर होता तो आतां आठ आण्यानें सुद्धां हातीं लागत नाहीं असें वाटतें. यंदाच्या पावसानें पीक कसें सावलें हेंच मोठें नवल होय. पण मध्यंतरी चित्रा व स्वाती या नक्षत्रांच्या पावसानें कपाशीचा जोम फार उतरला आणि त्यामुळें कपाशीचीं झाडें बिनजार व छोटीं छोटीं दिसूं लागलीं. ज्या वेळीं रात्रीच्या दवानें सकाळीं अमृतवृष्टी व्हावयाला पाहिजे होती त्या वेळीं ही पोषक वृष्टी अभावामुळें कपाशीच्या झाडांस मिळाली नाहीं; आणि त्यामुळें कपाशीचा यंदाचा हंगाम आठ आणे देखील हातीं लागेल किंवा नाहीं या विषयीं मोठी शंका

वाटते. या अंदाजाच्या चुकीमुळें शेतकऱ्यांचें फार नुकसान झालें आहे आणि हीच गोष्ट सरकाराच्या नजरेला आह्मी आरंभा पासूनच आणूं इच्छित आहों.

## प्रयागराज विश्वविद्यालय

प्रयागराज विश्वविद्यालयाची परिचयांतली संज्ञा अलाहाबाद युनिव्हरसिटी ही होय. आमच्या प्रांताचा संबंध याच संस्थेशीं जोडण्यांत आला आहे. मुंबई इलाख्याचा संबंध तुटल्यामुळें आमच्या मराठी वाङ्मयांत पुष्कळ फरक होण्याचा संभव आहे इतकेंच नाहीं तर आमचा नवा विद्याविषयक संबंध उत्तर हिंदुस्थानाशीं पडल्यामुळें विद्याक्रमामध्यें फेरफार होतील आणि दळणवळणाची देखील अभिवृद्धी होईल. अशा अदलाबदलीच्या प्रसंगीं अलाहाबाद युनिव्हरसिटीच्या मंत्री मंडळा मध्यें आमच्या प्रांतांतील कांहीं लोक अगदीं अवश्य पाहिजे होते. प्रांतांतील युरोपियन लोक फेलो नेमले असतें तरी देखील विशेषसा फायदा झाला नसता; अशा क्रांतीच्या संधानांत नागपूरचे राव बहादूर वामन महादेव कोल्हटकर, जज्ज स्मालकाज कोर्ट, नागपूर आणि उमरावतीचे प्रसिद्ध विद्वद्वर्य रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे बी. ए. एल एल. बी या उभयतांस युनिव्हर्सिटीच्या मंत्रीमंडळामध्यें फेलो नेमण्यांत आलें ही विशेष आनंदाची गोष्ट होय. राव बहादूर कोल्हटकर व रा० खापर्डे साहेब हे दोघेहि लोकमान्य गृहस्थ आहेत आणि त्यांस आपल्याकडील विद्याक्रमाचा पूर्व इतिहास चांगला माहीत आहे. यांच्या नेमणुकीपासून अलाहाबाद युनिव्हरसिटीला चांगला लाभ होऊन गृहस्थांच्या अनुभवाचा, विद्वत्तेचा व कार्यशक्तीचा उपयोग आमच्या प्रांताच्या विशिष्ट कल्याणाकडे होण्याचा संभव आहे. वरील नेमणुकीविषयीं आह्मी उभय गृहस्थांचें अभिनंदन करितों आणि त्यांत मुख्यत्वेंकरून रा. रा. दादासाहेब खापर्डे यांच्या सारख्या बहुमान्य सार्वजनिक हितकर्त्याचा आणि आनंदी उदारधीचा गौरव करितांना आह्मांला विशेष आल्हाद वाटतो.

## युद्धपर्व

रुसो–जपानी युद्धाचा अध्याय वाचतां वाचतां तो बाजूला ठेवून ऐकाकीच रुसो–इंग्लिश युद्धाचा नवा ग्रंथ वाचावा लागतो कीं काय अशी सर्वांस भीति पडली होती. हा नव्या ग्रंथास जर कां प्रारंभ झाला असतां तर हा ग्रंथविस्तार किती प्रचंड झाला असता याची कल्पना करणें कठीण आहे! युद्धपर्व म्हटलें ह्मणजे मग तें इंग्रजी असो वा भारती असो, तें रथी, महारथी, योद्धे, वाल्योद्धे, वीर पुरुष व वीरांगना यांच्या अतुल पराक्रमाच्या शौर्याच्या, व वीरश्रीच्या गोड व मनोवेधक कथांनीं प्रफुल्ल भरलेलें असावयाचेंच. अशा वीररसभरित कथांच्या श्रवणानें, कीर्तनानें, वाचनानें व मननानें कोणच्या जड देहाच्या ठायीं जीवनचेतना उद्भूत होणार नाहीं! मनुष्यास स्वभावतःच युद्धाच्या गोष्टी फार रम्य व प्रिय वाटतात. ह्या युद्धकथा मध्यें असेंच कांहीं अनिर्वाच्य अमृतरस ओतले आहेत कीं, त्यांच्या सेवनानें हतवीर्य, हताश व मृतप्राय झालेल्या देहांतहि स्फूर्तिसंचार झाल्याशिवाय राहणार नाहीं! या अमृतपानानें अंगांत वीरश्रीचा संचार होतो, बाहु स्फुरण पावूं लागतात, नीच वासनांना व पापकृत्यांना वीट उत्पन्न होतो आणि महात्मनेंनें सत्कृत्याकडे प्रेरणा होते. असल्या ह्या अतिरसाळ व अति मधुर युद्ध–काव्यांचें अनुवादन, परिशीलन व अनुकरण करण्याच्या मोहांत त्रिखंड जगत् गुरफटलें गेलें तर नवल काय आहे?

बाल्टिक आरमाराच्या हालचालीच्या दिवसापासून रुसो–जपानी युद्ध चांगलेंच थंड पडलें आहेसें दिसतें. रशियन सरकार आणि जपानी सरकार दोघेहि लढाई मोत्यर्थ फार दांडगें कर्ज काढून भावी भयंकर लढाईचा पैगाम बसवीत आहेत. म्यांचुरिआंत शांतता नांदत आहे; जणु काय ही शांतता पुढें होणाऱ्या प्रचंड झंझावाताचें पूर्व चिन्हच होय. पोर्टआरथर कडे पाहतां जपानी लोक एक सारखे नेटानें लढत लढत एक एक पाऊल पुढें सरकत आहेत तरी रशियन लोकांचा मगदूर कमी झालेला दिसत नाहीं. किल्ल्यांत अन्नपाण्याची तूट पडली आहे तरी रशियन लोकांच्या तोंडावर भीतीची छाया दिसत नाहीं. रशियन लोक प्राण जाई पर्यंत लढणार आहेत. अशी आणीबाणीचा वेळ तिकडे आली आहे.

रशियन लोकांची नाउमेदी झाली आहे तरी जनरल स्टेसिल यानें शिपायास हुकूम दिला आहे कीं, शरण जाण्यापेक्षां तुह्मी उभे आहात तेथेंच लढत लढत मरा. एकंदरीनें हा किल्ला जपानास बरेंच दिवस जेर करणार असें अनुमान आहे.

रशियाच्या बाल्टिक आरमारानें केलेल्या प्रतापाबद्दल रशियन सरकारानें इंग्रजांच्या सर्व अटी कबूल केल्या आहेत. अपराधी मनुष्यास चौकशी करून शासन करणाऱ्या कमिशनचें काम लौकरच सुरूं होईल. हा युद्धानल जागच्या जागींच विझविला या बद्दल पुष्कळ इंग्लिश लोकांस मानखंडणा वाटते. त्यांच्या मतें इंग्रजांनीं तात्काळ रशियाशीं युद्धप्रसंग करून चांगलें प्रायश्चित द्यावयास पाहिजे होतें. हा विचार प्रथम दर्शनीं मोठा वीरश्रीचा व राष्ट्रीय अभिमानाचा दिसतो. परंतु तो इतका दूरवर दृष्टी देऊन केलेला दिसत नाहीं. सध्यांचा कमिशन नेमण्याचा आणि नुकसानी भरून घेण्याचा विचारच मोठ्या मुत्सद्दीपणाचा आहे. दोघांच्या भांडणांत तिसऱ्याचें वर्चस्व चांगलें राहूं शकतें. शिवाय लढाई करण्याचें तोंडानें प्रोत्साहन देणें फार सोपें आहे, परंतु ह्या काळांत प्रत्यक्ष लढाई सुरूं करण्या पूर्वी निदान त्रिवार पूर्वविचार केला पाहिजे. प्रत्येक राष्ट्र दुसऱ्यास भिऊन लढाईचा धोका घेऊन मैदानांत उभें राहण्याचें धाडस करूं इच्छित नाहीं. दुसऱ्या पक्षीं रशियानें, आपल्यावर ओढवलेल्या संकटराशीं लक्ष्यांत घेऊन जें केलें तेंहि उत्तमच केलें. युरोप आणि एशिया यांच्यामध्यें साम्राज्याबद्दल चढाओढ लागली असतां युरोपांतील राष्ट्रांत आपसांतच धुमाकूळ माजणें अप्रशस्त होय.

अफगाणिस्थानांतील काबुली लोकांवरोवर इंग्रजांचा हस्तप्रसंग होण्याची वेळ येणार असें अनुमान करणाऱ्या कित्येकशा गोष्टी एकत्र जुळल्या होत्या. अमिराचा इंग्रजाकडून खंडणी घेण्याचा इनकार, आफ्रिडी लोकांस अमिराची मदत, उभयतांमधील सलोख्याच्या पत्रव्यवहाराचा अभाव आणि नवीन शिपाई प्यादे यांची भरती या गोष्टी लढाईचा रंग भरीत होत्या. तशांतच एक काबूलकडील नवी बातमी हा रंग तांबडीलाल करिते कीं काय अशी शंका सर्वांस प्राप्त झाली. ही बातमी ह्मणजे मि. ग्रीअर नांवाच्या एका इंग्लिश मनुष्याचा, हिंदुस्थानाकडे येत असतांना, वाटेंत झालेला खून होय. हा खून ऐकल्याबरोबर लढाईची डंका नौबत वाजूं लागण्याचाच प्रसंग आला होता. पण हें अरिष्ट टळलें. त्या इंग्लिशमनचा खून करण्यांत अमिराचें कांहींच अंग नव्हतें. त्याच्या दफेदारानें आपलें वैर साधून हा खून केला होता आणि खुद्द अमीर साहेबांनीं त्या अपराध्यास सुळावर चढविलेंहि. अमिराच्या मनांत इंग्रजाविषयीं कांहीं काळेंबेरें असावें असा जो कुतर्क आहे तो अमिराच्या चिरंजीवाच्या हिंदुस्थानांत आगमनामुळें आणि काबूल मिशनमुळें विलयास जावो ह्मणजे झालें.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**— मध्यंतरी अभ्रें येऊन थंडीचें मान फार उतरलें होतें पण आतां पुनः थंडी चांगली पडूं लागली आहे. सार्वजनिक आरोग्य अधिकाधीक समाधानकारक होत आहे. प्लेगचें मान उतरत चाललें आहे; नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यांत वऱ्हाडांत १२९ लोक लागले व ९६ मरण पावले. मरणाची मोठी संख्या आमच्या जिल्ह्यांतील आहे.

लेफ्टेनंट कर्नल राबर्ट क्रस्नॉन ग्यारेट सिव्हिल आणि सेशन जज्ज हे रजेवर होते; आतां गेल्या १४ वे तारखे पासून त्यांनीं पेनशन घेतलें आहे. आमच्या प्रांतांत यांची पुष्कळ वर्षें चाकरी झाली व पुष्कळशा खात्यांचा त्यांस चांगला अनुभव होता. हे गृहस्थ सत्वस्थ, पापभीरू व विनयशील असें असल्यामुळें त्यांचा अधिकार लोकांस सुखप्रद होत असे.

रा. रा. एफ. डब्ल्यू. ग्रीडो आफि० सिव्हील आणि सेशन जज्ज यांस १९ वे नोव्हेंबर पासून त्याच श्रेष्ठ हुद्यावर कायम करण्यांत आलें हें कळविण्यांस परम संतोष वाटतो.

क्याप्टन मारिस असिस्टंट कमिशनर उमरावती यांस ॲडिशनल सिव्हिल आणि सेशन जज्ज नेमल्या विषयीं आह्मी पूर्वीच कळविलें होतें पण मध्यंतरी ही नेमणूक अमलांत आली नाहीं तरी आतां ही नेमणूक लवकरच अमलांत येईल हें आह्मी आनंदानें कळवितों.

वरील नेमणुकीमुळें खामगांवचे असि० कमिशनर रा. रा. क्राफर्ड यांची बदली तेथून उमरावतीस करण्यांत आली. या अधिकाऱ्यांची वस्ती पुष्कळ वर्षांपासून एकसारखी खामगांवासच आहे तेव्हां या स्थलान्तरामुळें त्यांस पुष्कळ सौख्य होईल असें आह्मांस वाटतें.

रा. रा. बी. क्रे असि० कमिशनर बुलढाणा यांस पुनः आकोला जिल्ह्यांतून बदलून खामगांवास नेमण्यांत आलें. हे सब डिव्हिजन आफिसर आहेत, तेव्हां त्यांच्याकडून काढून घेतलेले समरी माजिस्ट्रेटीचे अधिकार त्यांस परत समर्पण करण्याला विलंब कां लागला आहे हें त्या कुटिल नृपनितीलाच विचारलें पाहिजे.

मुनशी अजिजुद्दीन साहेब असिस्टंट कमिशनर यांनीं गुरुवारीं येथील सिव्हिल जज्जाचे कोर्टाच्या कार्यमालेला प्रारंभ केला.

कुमारिका आडा हेज या विलायतेहून मध्यप्रांतांतील कन्याशाळांच्या इनस्पेक्ट्रेस होऊन आल्या आहेत. मुलींच्या परीक्षा घेण्यासाठीं या बाई मुद्दाम नेमण्यांत आल्या आहेत. ही योजना अगदी नवीन असून एका विलायती कुमारिकेच्या विद्यासंपन्नतेला चांगला आश्रय मिळाला.

**आगीचा खटला**— या सेशन मोकदम्यांतलि पुरावा गेल्या गुरुवारीं संपूर्ण झाला. या संबंधाचीं उभय पक्षांचीं संभाषणें आज होणार आहेत.

तारीख १६ जानेवारी पासून वऱ्हाड शिक्षक समाजाच्या वार्षिक संमेलन आकोल्यास प्रारंभ होणार आहे.

**हुर्डा–समारंभ**— आमच्या येथील लोकप्रिय श्रेष्ठ वकील रा. रा. हणमंत राव खानझोडे यांनीं काल सायंकाळीं आपल्या मित्रमंडळीस हुर्ड्याची मेजवानी दिली. हा आमच्या प्रांताचा अजब मेवा आणि त्या निमित्तानें मित्रसमुदाय जमवून आनंद करण्याची ही तऱ्हा अनुकरणीय आहे. आमच्या लोकांत आवळी भोजन, वनभोजन इत्यादि अगदीं लोपत चालले आहेत व असे हुर्ड्याचे प्रसंगही कमी होत चालले अशा वेळीं हा करमणुकीचा प्रकार च्या दृष्टी समोर आह्मी मुद्दाम आहों. शरिराला व मनाला असे फार आल्हादकारक असतात.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | |
| सोनें २४।– | |
| जवारी ३०–४६ | |
| गहू काठे ७०–७२॥ बनशी | |
| सरकी | |
| मीठ | |
| चणे | |
| तूप | |
| तेल | |

वर्तमानसार.

मद्रास इलाख्यांत वायनाड जिल्ह्यांत एक प्रकारची माती आहे, ती खावयाची लोकांना इतकी चटक लागली आहे कीं, ती सुटत नाहीं. ती खाल्ल्यामुळें उदर होऊन कांहीं बायका मेल्याचीं उदाहरणें आहेत.

कष्टे पोहणार— सर्व जर्मन सोल्जरांना पोहावयाला आलेंच पाहिजे असा कायदा आहे. कित्येक इतके पटाईत पोहणारे असतात कीं आपले कपडे डोक्यावर घेऊन बंदुक दारुगोळा वगैरे सह शेंकडों यार्ड रुंदीची नदी पोहून जातात.

पुढारी स्त्रिया–आईस्लंड बेटांत स्त्रिया व पुरुष या दोघांनाही सारखेच राजकीय हक्क आहेत. तेथील लोकसंख्या ७०,००० आहे. राज्यकारभार पुरुष व स्त्रिया दोघांनींहि निवडलेले प्रतिनिधिमंडळ चालवितें.

प्रसिद्ध चित्रकलाभिज्ञ ग्रिफिथसाहेबांनीं आजिंठ्याच्या लेण्यांतलीं कित्येक चित्रें पाहून पुढील उद्गार काढले आहेतः—

"ज्या चित्रकारांनीं हीं चित्रें काढलीं ते कोणी जंगी राक्षसी प्राणी असावेत. उंच भिंतीवर ब्रशाच्या एका झटक्यासरशी ज्या लांब लांब रेषा त्यांनीं काढल्या आहेत, त्या पाहून मी थक्क झालों. तशाच छतावर लांब कमानीदार आडव्या रेषा न थांबतां एका दमांत फार अडचणीच्या जागीं, पण इतक्या प्रमाणबद्ध आणि बिनचूक काढलेल्या आढळल्या कीं त्या पाहून मला हा कांहीं अलौकिक चमत्कार असावा असें वाटलें........हिंदुस्थानांत चित्रकलेचें अध्ययन करणारापुढें आजिंठ्याच्या या लेण्यांतल्या नमुन्याशिवाय दुसरे कोणतेही नमुने ठेवणें अगदीं व्यर्थ आहे. हीं चित्रें किती सुबक, किती हुबेहुब आहेत! माणसाचे हस्तपादादि अवयव किती अचूक रीतीनें दाखविले आहेत. फुलांची टवटवी अझून गेली नाहीं; उडणारे पक्षी, प्रीतीनें वागणारीं, परस्पराशीं लढणारीं, किंवा ओझ्यानें लादलेलीं श्वापदें, सगळीं हीं जणूं काय सृष्टिदेवतेच्या चित्रफलकावरून जशींचीं तशीं उतरून घेतलीं आहेत."

लोकांचे स्वभावधर्म–– इटालियन लोकांसारखे माथेफिरू, गडबडे, बडबडे व ... दुसरे कोणी नसतील. फ्रेंच, स्प्यानिश आणि पोर्तुगीज हे फार बोलघेवडे. जर्मन आणि डच हे तोंडाचे फारच जड. अमेरिकेंतील मूळचे रहिवाशी हे तर यांहीपेक्षां मुखदुर्बळ; खुषींत असोत किंवा नसोत, ते हो किंवा ना, असें लांब तोंड काढून सांगतील.

कोंडलेल्या हवेनें चालणारें यंत्र– युनैटेडस्टेटसमधील दक्षिणेकडील कित्येक प्रांतांतून ग्रेटब्रिटनकडे कापूस पाठवितांना कोंडलेल्या हवेच्या यंत्रानें तो आगबोटीवर चढविण्यांत येतो. या मुळें ठिणग्या उडून आग लागण्याची भीति रहात नाहीं. वाफेच्या ... प्रमाणें या यंत्रास पाण्याचे हंडे व नळ असतात. पाण्याच्या हंड्यांत हवा ... ती पाठीमागच्या दाबानें लांबोळ्या नळांतून जोरानें सोडतात. हजारों कापसाचे गठ्ठे; लांबवर गाड्यांची रांग तासाला १०।१२ मैल इतक्या वेगानें हें यंत्र ओढून नेऊं शकतें. हें यंत्र चालविण्यास अग्नीची मुळीच ठिणगीही लागत नाहीं. न्युआर्लियन्सजवळ कांहीं मिसिसिपी नदीवर चालमर बंदरांत हीं यंत्रें सध्या कामांत आहेत.

## खरा यज्ञयोग

जैन लोकांचे प्राचीन वेदग्रंथ कर्नाटक प्रांतांतील ब्राह्मणाजवळ सांपडतात असें ह्मणतात. ह्या धर्मग्रंथांत असें स्पष्ट ह्मटलें आहे कीं, खरा यज्ञयाग पशूची हत्या केल्यानें होत नाहीं. खरा यज्ञयाग ह्मटला ह्मणजे त्यांत स्वतःचीच आहुती दिली पाहिजे ह्मणजे स्वार्थत्याग केला पाहिजे. ह्या यज्ञांत तपश्चर्या हा अग्नि, खरें ज्ञान हें तूप, सुकृति ह्या समिधा, क्रोध; दर्प, भ्रम स्वार्थपरायणता इत्यादि नाच विकार हे ह्या यज्ञांतील बळी, सत्य भाषण हा यूप, प्राण्यांचें संरक्षण ही ह्या यज्ञांतील दक्षिणा आणि विद्या, वेदान्त आणि सदाचार ही वेदत्रयी.

साबणाचे ऐवजीं— पृथ्वीच्या पाठीवर पुष्कळ अशीं झाडें व वेली आहेत कीं, त्यांच्या फळांचा, चिकांचा किंवा सालींचा धुण्याचे कामीं साबणासारखा उपयोग होतो. वेस्ट इंडीज बेटांत व दक्षिण अमेरिकेंत एका झाडाचीं फळें इतकीं फेसाळतात कीं, त्यांचा कपडे धुण्याचे कामीं चांगला उपयोग होतो. पेरू देशांत उत्पन्न होणारी एक प्रकारचीं झाडें आहेत; तशींच मले बेटांतही आहेत. त्यांच्या सालीचा साबण होतो. इंग्लंडांत एक प्रकारचें झाड उगवतें. त्याचे गुणधर्म साबणासारखें आहेत; त्यांचीं पानें पाण्यांत कुसकरलीं ह्मणजे त्यांस दरदरून फेंस येतो.

## जाहिरात

सर्व लोकांस या जाहिरातीनें कळविलें जातें कीं, आमची भावजई नामें बकाई मर्द महादू हिजपासून कोणी मौजे आलेगांव येथील सर्व्हे नंबर १४७ पैकी यांतील हिस्से खेरेदी, गहाण, किंवा बक्षीस घेऊं नये कारण असा व्यवहार करण्याचा तिला अधिकार नाहीं. या उपर कोणी केल्यास तो व्यवहार पोकळ ठरून त्याची जबाबदारी ज्याची त्याजवर राहील. त्या इस्टेटीस बांधूं शकणार नाहीं. कळावें ता० १८–११–०४ इ.

सही

रामू वल्लद कुकाजी काळबांडे माळी
राहणार आलेगांव दस्तुर खुद्द.

## पोर्टेबल क्यामेरा

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, बारा दहाचा उत्तम, नवीन व पोर्टेबल असा क्यामेरा विकावयाचा आहे ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा. इच्छा असल्यास फोटोग्राफीही शिकविली जाईल. तारीख ६ माहे नोव्हेंबर सन १९०४ इ०

पत्ताः— रामजी नारोबा दलाल आकोला. (पेठ)

## नोटीस

रा. रा. मैन्या वल्लद सटवा राहणार पोहे ता. मूर्तिजापूर पोस्ट कारंजा यासः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तूं माझा लग्नाचा नवरा आहे. मी शहाणी झाल्यास सुमारें चार वर्षें झालीं त्या वेळेपासून तूं मला आपले घरीं मुळींच नेले नाहीं. मला संसार करणें अगत्य आहे. मी तुमची आतांपर्यंत घेऊन जाल ह्मणून वाट पाहिली परंतु तुमचे मनांत मला नांदविणें नाहीं असें दिसतें. मी आपल्या भावाचे घरीं लोकाचें कर्ज काढून उदर निर्वाह करीत आहे. आतां मजला कोणीच कर्ज देत नाहीं. कारितां तीन वर्षांचें खावटीचे पैसे दरसाल ५० रुपये प्रमाणें १५० रुपये देऊन साहूचे हातची पावती घ्यावी व मला आपले घरीं घेऊन जावें. मी तुमचे घरीं नांदण्यास खूष आहे. नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत मला न नेल्यास हीच नोटीस फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. खावटीचे पैशाबद्दल व नोटिशीचे खर्चाबद्दल दिवाणींत फिर्याद करून सर्व पैसा भरून घेईन कळावें ता. १२।११।०४ इ०

सही

रेणी मर्द मैन्या राहणार मोरळ
ता. आकोला पोस्ट कारंज
निशाणी खुद्द हातची बांगडी.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस जाहिरातीनें कळविण्यांत येते कीं आह्मी शंकरलाल वल्लद कणीराम मारवाडी राहणार मोरगांव यास तारीख १३–९–०४ रोजीं कुलमुकत्यारपत्र लिहून नोंदून वगैरे दिले ते या जाहिरातीनें रद्द केले आहे. आमच्या मुकत्यारपत्रावरून कोणीही त्याच्याशी देवघेव करूं नये. केल्यास ज्याचा तो जबाबदार राहील. कळावे, तारीख १७–११–०४ इसवी.

सही

किसनदास वल्लभदास अ. पा०
करणार आई बसंतीबाई जवजे
रामलाल राहणार खंडाळे
ता. बाळापूर निशाणी
खुद्द हातची बांगडी.

## नोटीस

वेशमी बकाई मर्द महादू काळबांडे माळी राहणार आलेगांव पोस्ट–आलेगांव तालुक बाळापूर यांसः–

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, तुह्मी आमच्या भावजई आहात. माझा भाऊ महादू ह्मणजे आपला नवरा हा गेल्या काळांत मरण पावला. आज चार पांच वर्षें तुह्मी शेतीवर आपला उदरनिर्वाह चालविला. पण आतां आह्मी असें ऐकतो कीं तुह्मी आलेगांव येथील सर्व्हे नंबर ४७ पैकीं या शेत तील तुमचे मालकीचे हिस्से तुह्मी कोणास विकणार आहात तर असे कळवितो कीं, आपणास ते हिस्से विकण्याचा अधिकार नाहीं. आपण जिवंत आहात तोंपर्यंत त्याचा उपभोग घ्यावा. आपल्या पोटापाण्यास ती शेती पुष्कळ आहे. आपल्या पाठी मागें त्या हिश्याचे अह्मीच कायद्यानें वारसदार आहोंत तर ते हिस्से कोणास गहाण, खेरदी, किंवा बक्षीस देऊं नये ह्मणून तुह्मांस या नोटिशीनें मनाई केली आहे. या उपर जर असा व्यवहार केलात तर तो बातल ठरला जाईल. कळावें ता. १८।११।०४ इ.

सही

रामू वल्लद कुकाजी काळबांडे माळी
आलेगांव दस्तुर खुद्द.

## नोटीस

रा० रा० शंकरलाल वल्लद कणीराम मारवाडी राहणार मोरगांव सादिजन ता० बाळापूर पोष्ट आकोला यांसः–

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास ता. १३।९।०४ रोजीं पांच रुपयाच्या स्टांपावर कुलमुकत्यारपत्र दिले होते ते ह्या नोटीसीचे तारखेपासून रद्द केले आहे आह्मी दिलेले मुकत्यारपत्रावरून तुह्मी कोणतेही प्रकारची देवघेव वगैरे करूं नये केल्यास त्याबद्दलची जबाबदारी तुमचे शिरावर राहील. त्याबद्दल आह्मी व आमची इस्टेट जबाबदार राहणार नाहीं. कळावें तारिख १७।११।०४ इ.

सही– किसनदास वल्लभदास अ. पा.
करणार आई बसंतीबाई जवजे
रामलाल राहणार खंडाळे पोष्ट
आकोला निशाणी खुद्द
हातची बांगडी.


श्रीमंत रा· सा· मल्लापाअण्णा वारद,
सोलापूर–यांनीं अनुभव घेऊन पसंत केलेल्या

# वझेकृत कफनाशक गोळ्या.

लहान मुलांस कफ दाटून श्वास लागतो, खोकला येतो, कफ थुंकतां येत नाहीं, दूध किंवा अन्न खावेनासें होऊन मुलें घाळ पडतात, ज्याला–

सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, मुंबई हे पुष्कळ वर्षे वापरीत आहेत.

## पोटांतलें, डबा, सुशी,

असें ह्मणतात; त्यांवर अगदी इजा न होतां खातरीनें

## दोन तासांत गुण देणाऱ्या

डॉ. देशमुख M.D. मुंबई यांनी उपयोग करून पसंत केल्या आहेत.

अनेक डॉक्तर, वैद्य यांच्या वीस वर्षांच्या अनुभवानें आबालवृद्धादि सर्वत्रांस सारख्या उपयोगी ठरलेल्या.

| | |
|---|---|
| अनुपान कागदासह | रोखीनें अगर व्हा. पे. पार्सलनें मिळतील. |
| ५ गोळ्यांचे कुपीस ।- रु. | ग्राहकांचा पत्ता पोष्टाचे नांवासह सुवाच्य असावा. |
| २५ ,, ,, १ रु. | व्यापाऱ्यांस कमिशन मिळतें त्याचा ठराव समक्ष अगर पत्रद्वारें करावा. |
| १०० ,, ,, ३ रु. | मालक—वि. शि. वझे, सावंतवाडी. |

ISTERED No. N. 4

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत....१ रु
दर ओळीस..........८।०६
दुसरे खेपेस...............८।

All Subscriptions to be paid in advance
Single copy ............................ 2 as

Advertments

Below 10 lines ... ... 2 Rs
Per line over 10 ... ... 3 as
Repetitions Per line...2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 28 NOVEMBER 1904 NO 46

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २८ माहे नोंवेंबर सन १९०४ इ० अंक ४६

## नोटीस

वऱ्हाड म्युनीसिपल कायद्याचे कलम ११४ प्रमाणें.

मुनिसिपल हद्दींतील ज्या जागेचा उपयोग खालीं लिहिलेल्या पैकीं कोणत्याही कामा करितां होत असेल अशा प्रत्येक जागेचे मालकानें किंवा वहिवाटदारानें या कामा करितां कमिटीनें तयार करून ठेवलेल्या बुकांत ती जागा रजिस्टर केली पाहिजे. तीं कामें येणेंप्रमाणें:—

चर्बीचा रस करणें; अथवा

हाडें, गाळ, किंवा रक्त शिजविणें; अथवा

साबण तयार करणें, तेल कढवणें, रंग देणें; अथवा

कातडें कमावणें; अथवा

विटांची भट्टी, कुं[illegible]ाचा कारखाना; अथवा

चुन्याची भट्टी या करितां; अथवा

ज्या पासून घाणेरडे अथवा अपाय कारक गंध उत्पन्न होतात तशा प्रकारचा एखादा कारखाना अथवा कामाची जागा या करितां; अथवा

वाळलेल्या गवताचा, धाडाचा, शाकारणी करितां ज्या गवताचा उपयोग करितात त्या गवताचा, लांकडांचा, कोळशाचा अथवा भयंकर रीतीनें लवकर पेट घेणाऱ्या एखाद्या दुसऱ्या जिनसांचा व्यापार करण्याकरितां वखार अथवा खावार या करितां अथवा केरोसेन ( राक आईल ) पेट्रोलियम, नखतेल, किंवा लवकर पेट घेणारे कोणतेंहीं तेल, मद्य अथवा पेट वेऊन उडणारा जिन्नस हे ठेवण्याच्या कोठारा करितां.

सदरहू कलमांत सांगितल्या प्रमाणें कमिटीनीं रजिस्टर ठेविलें आहे तरी सर्व लोकांस या जाहिरातीनें कळविण्यांत येतें कीं वर लिहिले प्रमाणें उपयोगांत असलेल्या जागेच्या मालकांनीं अगर वहिवाटदारांनीं सदरहू जागा कमिटीचे ऑफिसांत ह्या नोटिसीचे तारखे पासून एक महिन्याचे आंत अर्ज देऊन नोंदून घ्याव्यात व ह्या मुदती नंतर कमिटीकडून परवाना घेतल्या शिवाय वर सांगितल्या पैकीं कोणत्याही कामाकरितां कोणत्याहि जागेचा नवीन उपयोग करूं नये. सदर्हू परवाना प्रतिवर्षी पुन्हां घेतला पाहिजे.

ह्या रीतीनें रजिष्टर केल्या शिवाय अथवा परवाना घेतल्या शिवाय जो कोणी कोणत्याही जागेचा अशा प्रकारच्या कोणत्याही कामा करितां उपयोग करील तो मुनिसिपल कायद्या प्रमाणें शिक्षेस पात्र होईल.

*A. HAIDAR ALI*

व्हाईस चेअरमन.

म्यु० कमेटी आकोला.

---

दिवाणी किरकोळ मुकदमा नंबर ७ सन १९०४ वर्ग २२.

सन १८८१ चा आक्ट नंबर ५ कलम ६९ प्रमाणें प्रोबेट सर्टिफिकीट मिळण्याविषयीं अर्ज केल्यावरून जाहीरनामा.

विद्यमान दिस्त्रीक्ट जडज्य साहेब जिल्हे उमरावती याचे कोर्टांत

अर्जदार– जगनलाल व भाऊ मुळचंद वल्लद पुरणमल मारवाडी साहू दुकान थूगांव ता. उमरावती

मयत– तुकाराम वल्लद रुपराम जात आगरवाले राहणार राम ता. उमरावती.

मैत तुकाराम वल्लद रूपराम आगरवाले राहणार राम ता. उमरावती यानें तारीख ६ माहे एप्रील सन १९०४ इसवी रोजीं आपले जिनगीचें मृत्युपत्र करून ठेविल्याप्रमाणें प्रोबेट आणि ॲडमिनीस्ट्रेशन ( अक्ट नंबर ५ सन १८८१ ) च्या कलम ६२ किंवा ६४ अन्वये सरटिफिकीट मिळावें म्हणून वरील अर्जदार यानें अर्ज केला आहे. याजकरितां सदरहू मैत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यांना या जाहिरनाम्याचे द्वारें कळविण्यांत येते कीं, त्यांनीं सदरहू अर्जाची चौकशी विद्यमान डिस्ट्रीक्ट जडज्य साहेब जिल्हे उमरावती यांचे कोर्टांत तारीख २० माहे दिसेंबर सन १९०४ इसवी रोजीं दिवसाचे ११ वाजतां स्वारी असेल तेथें केली जाईल त्यावेळीं सदरहू कोर्टांत हजर होऊन सरटीफिकीट मिळे पावेतों जें काम चालेल तें पाहावें.

ही नोटीस आज तारीख १९ माहे नोवेंबर सन १९०४ इसवी रोजीं आमचे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं दिली असे.

R. A. Godwin Austin

डिस्ट्रीक्ट ज्यडज्य.

उमरावती.

---

## शेती संबंधी कांहीं माहिती

### जामिनीची मशागत व आउतें.

मशागत करण्याचे हेतु– शेतांत एखादें पीक पेरण्या करितां व पेरल्या नंतर ते चांगलें यावें व आंतील तण, रानझाडे वगैरे नाहींशीं व्हावींत ह्मणून शेतकऱ्यास निरनिराळ्या वेळीं नांगरणी डवरणी वगैरे जे जे व्यापार करावे लागतात त्या सर्वांचा मशागत या शब्दांत समावेश होतो. जमिनीची मशागत करण्याचे मुख्य हेतु चार आहेत.

१ पिकांच्या मुळानां जामिनींत खोल शिरतां यावें, त्यानां जवळपासच्या जमिनीच्या भागांतून निरनिराळी द्रव्य घेऊन आपलें पोषण चांगल्या रीतीनें करतां यावें व झाडांच्या मुळानां जमिनींत पकड चांगली सांपडावी ह्मणून जमीन अगदीं मऊ व बारीक करणें.

२ जामिनींत जीं वनस्पती पोषक द्रव्यें अद्राव्य स्थितींत असतात तीं द्राव्य व वनस्पति पोषणास योग्य अशा स्थितीत यावी व जामिनींत जे पदार्थ वनस्पतीनां अपायकारक असतात त्यावर हवेचा परिणाम होऊन तीं निदार्षे व वनस्पतिपोषणास योग्य अशीं व्हावींत ह्मणून जामिनींत हवेचा प्रवेश होऊं देणें.

३ जामिनींतील तण, रानझाडे व कुंधा हरळी नाहींशीं करून जमीन साफ करणें.

४ पावसाचे व पाटाचे पाणी पूर्णपणें शोषण करून घेण्याची पात्रता जामिनींच्या अंगीं आणणें.

जमीन व अधोभूमिका– पृथ्वीच्या पृष्टभागावर जो मातीचा थर असतो त्यास जमीन असें नांव मागें देण्यांत आलें आहे. परंतु त्यांतल्यात्यांत पाहिलें असतां शेतांत जो अगदीं वरचा मातीचा थर असतो व जो नांगरानें हलवला जातो त्यास जमीन ह्मणावें व खालच्या थरास अधोभूमिका असें ह्मणावें. कधींकधीं जमीन व अधोभूमिका यांतील मातींत अगदींच फरक नसल्यामुळें ती दोन्ही अगदीं सारखी दिसतात; परंतु बहुत करून अधोभूमिका वरच्या जामिनीपेक्षां अधिक फिक्या रंगाची असते. त्या दोहोंच्या सुपीकपणांतही पुष्कळ अंतर दिसतें. शेताची किंमत असते ती जामिनीच्या खालच्या थरावर पुष्कळ अंशीं अवलंबून आहे. आधोभूमिका जर चिकण मातीची असली किंवा त्यांत रेती किंवा दगड फार असले तर जमीन नापीक असते. त्याच प्रमाणें जामिनीच्या खालीं लागलींच मोठा खडक असला तर तींत पीक येण्याचा कांहीं संभव नसतो. कारण चिकण मातींत वरील झाडांच्या मुळांचा शिरकाव होण्यास फार प्रयास पडतात; व खडकांत तर त्यांना मुळींच वाव मिळत नाहीं. जामिनीखालीं दगड व रेती फार असली ह्मणजे जमिनींत घातलेलें खत खोल जमिनींत उतरतें आणि झाडांच्या मुळांस पोंचत नाहीं अशा जमीनीस तें वरचेवर घालावी लागतात ह्मणून हिला बुभुक्षित अथवा भुक्कड ह्मणतात

मशागतीचें साहित्य– शेतकरी लोक बहुत करून जो वरचा मातीचा थर असतो व त्यास आपण जमीन ह्मणतो तिचीच मशागत करतात. मशागत करण्याची साधनें दोन प्रकारची आहेत. पहिल्या प्रकारची साधनें झुंरण्याची व दुसऱ्या प्रकारची हात कामाचीं होत. नांगर व वखर ह्यास बैल किंवा रेडे जुंपून ओढावीं लागतात. व कुदळ खुरपीं हीं हातकामाच्या वेळीं उपयोगीं पडतात. साधारण प्रतीच्या कुणब्या जवळ कांहीं फारशी आउतें नसतात. कित्येका जवळ तर नांगरसुद्धां नसतो. डवरे हेच काय तें शेतीचें साधन त्यास माहीत असतें. निरनिराळ्या प्रकारचे लहान मोठे नांगर व शेतकीच्या इतर आउतांचा संच ज्या जवळ चार पैसे असतात असाच मनुष्य बाळगतो.

**नांगराचा उपयोग**–जमीन पोकळ व भुसभुशीत व्हावी इतकाच कांहीं नांगराचा उपयोग नाहीं, तर त्या मुळें नांगरलेली जमीन खालवर झाली पाहिजे. खालची जमीन वर व वरील जमिन खालीं झाली ह्मणजे तींत हवा मिसळून ती वनस्पति पोषणास योग्य अशी तयार होते. आपल्या इकडील नांगरानें जमिन खालवर न होतां फक्त पोकळ मात्र होते. खालची व वरची जमीन मिसळल्यामुळें खालीं लिहिलेले फायदे दिसून येतात.

१. खालच्या मातींतील कठीण थर वर आल्या नंतर त्यावर हवेची क्रिया घडून अगदीं बारीक मऊ व भुसभुशीत होतात.

२. रानझाडें व गवत यांचे मातींत मिसळलेले तुकडे जमिनीच्या पृष्ठ भागावर येऊन पडले ह्मणजे ते कुजतात किंवा त्यांचीं मुळें उष्णतेनें वाळून मरतात.

३. अळ्या, किडे व पिकास अपायकारक असे जे अनेक जीवजंतु असतात ते वर आले ह्मणजे कावळे मैना खाऊन टाकतात किंवा उन्हांत तरफडून मरण पावतात.

खोल नांगरणी करून जमीन खालवर केल्यानें तोटे ही होण्याचा संभव असतो.

१ ज्या देशांत उष्णता फार आहे तेथें वनस्पतिजन्य अंश ज्याला ह्युमस ह्मणतात तो फार थोडा असतो व हा अंश उघडा केला असतां त्यांतील नायट्रोजन रूपीं भाग हवेंत उडून जातो. व जमीन नापीक होते.

२ जमिनीचा थर पातळ असून अधोभूमिका खडकाळ असली किंवा तींत वनस्पतीस अपाय कारक पदार्थ असले तर असा खडक किंवा अपाय कारक पदार्थ जामिनींत मिसळल्यानें तिच्या पिकाऊपणांत कमीपणा येण्याचा संभव आहे.

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ६ शके १८२६

## नवा कर

( पाणीपट्टी कीं जकात )

आमच्या येथील मुनसिपालिटीला उत्पन्न वाढविण्याची फारच गरज आहे. खर्चीच्या बाबी वाढल्या नाहींत व त्यामुळें मुनसिपालिटिचे हात खर्चा संबंधानें अधीक तंग आहेत. कित्येक उपयुक्त व आवश्यक सुधारणा अंमलांत आणावयाला पाहिजेत पण पैशाच्या अडचणीमुळें त्या सुधारणा बाजूला साराव्या लागतात. उत्पन्नाच्या ज्या बाबी मिळावयाला पाहिजेत त्या मिळण्याची आशा नाहीं. अशा स्थितींत उत्पन्न वाढविल्याशिवाय गत्यंतर नाहीं. अलिकडील चार पांच वर्षांत मुनसिपालिटीनें अनेक उलथापालथी करून पाहिल्या पण खर्चीच्या तोंडाला आळा बरोबर बसत नाहीं व उत्पन्न वाढविण्याचे मार्ग फार थोडे उपलब्ध आहेत. नुकतांच जो इनकम-ट्याक्स ह्मणून सरकारि कर बसला आहे तो फार जबरदस्त आहे. त्याचा व मुनसिपलकरांचा अर्थाअर्थी संबंध नाहीं पण त्या बादशाही करामुळें लोकांची ऐपत नवीन कर देण्या संबंधानें फारच कमी झाली आहे व ही गोष्ट मुनसिपालिटीला पदोपदीं लक्ष्यांत घ्यावी लागते. सध्यां मुनसिपल घरपट्टी आहे ती घराच्या वार्षिक भाड्याच्या उत्पन्नावर आकारलेली आहे. हा कर मोठा जबर आहे. त्या शिवाय गाडी, बैल, कुत्रा इत्यादिकांवरही कर आहेत. मुनसिपालिटीची भंगीपट्टीहि जवळ जवळ घरवाल्याच्या उत्पन्नावरच आकारलेली आहे. त्या शिवाय कपाशीच्या व्यापारावर निराळे मुनसिपल कर आहेत आणि त्यांचें उत्पन्नही चांगलें आहे.

या करांनीं मुनसिपालिटीचा खर्च नीटसा भागत नाहीं. हे कर उत्तरोत्तर वाढत आहेत हें खरें पण मुनसिपालिटीच्या उत्पन्नापैकीं सरकारि नोकरापासून घ्यावयाचा टाऊनफंड सरकारानें बंद केला, आणि मुनिसिपल हद्दींतील खुल्या जागांचें भाडें सरकारानें आपल्याच तिजोरींत ओढून घेतल्यामुळें मुनसिपालिटीची नुकसानी झाली. या दोन बाबी कमी झाल्या आणि म्युनिसिपालिटीच्या खर्चाची सदरें मात्र वाढत आहेत, अशा स्थितींत नवीन कर बसविला पाहिजे हें अगदीं निर्विवाद आहे.

म्युनिसिपालिटी ही लोकांच्या सुखासाठीं आहे आणि म्युनिसिपल जहागिरीचे चालक अशाच दृष्टीचे पाहिजेत कीं त्यांनीं लोकांची सुखसंपदा वाढवितांना देखील लोकांची गरिबी व श्रीमंती हीं पूर्णपणें लक्ष्यांत घेऊन लोकांवर नवे कर बसविण्याचा विचार करावा सध्यां आमच्या म्युनिसिपल सभासदांच्या मनांत दोन नवे कर घोळत आहेत. पहिला कर ह्मणजे पाणी—पट्टी होय आणि दुसरा कर जकातीचा वसूल हा होय. हे दोन्ही कर एकदम चालू करावेत इतकी पैशाची जरूरी नाहीं. पण सध्यां पाणी-पट्टी सुरू करावी किंवा जकात सुरू करावी एवढाच वाद आहे. या वादा संबंधानें सर्व म्युनिसिपल मंत्रिमंडळांत पुष्कळ चर्चा चालू आहे. आणि प्रस्तुतच्या भवतिनभवति मध्यें कोणता निर्णय बहुमताला पसंत ठरेल या विषयीं आतांच कांहीं अनुमान करितां येत नाहीं. कां कीं दोन्ही प्रकारच्या मताचे बरेचसे पुरस्कर्ते आहेत. कांहीं जणांचे मतें पाणीपट्टीच बसवावी. कारण त्या जकाती पेक्षा हाच कर त्यांस विशेष सोयीचा दिसतो. घरपट्टी बरोबरच ह्या कर वसूल करण्यांत येईल. आणि घरपट्टीच्याच मानानें या कराची आकारणी करितांना फारसा प्रयास पडणार नाहीं. गरीब व श्रीमान् या दोघांनाहि हा कर द्यावा लागेल, आणि हल्लीं नळाच्या पाण्याचा जो सुखोपभोग लोकांना मिळतो आहे त्याच्या मोबदल्यांत हा कर देण्याला लोकांना कुरकुर करण्याला जागा नाहीं. असा हा वाद घालणाऱ्या मंडळींचा मुख्य सिद्धांत आहे. आतां या पाण्याच्या करा संबंधानें आक्षेप आहेत ते असे. अगोदरच म्युनिसिपल करांचा बोजा फार जबर आहे आणि नवीन बादशाही इनकम-टॅक्स बसल्यामुळें नवीन कर देण्याचे लोकांचें सामर्थ्य अगदीं शून्यतेला पोहोंचलें आहे. त्या शिवाय हा पाण्याचा कर येथील घरावर आकारतांना असें दिसून येईल कीं, घरपट्टीच द्विगुणित किंवा त्रिगुणित केल्यासारखी होईल. घरावर इतका जबर कर वसूल करणें न्यायाचें होणार नाहीं. त्या शिवाय या पाणी पट्टीला मोठा आक्षेप असा आहे कीं ही पाणी पट्टी देऊनहि लोकांच पाण्याचें दैन्य नाहींसें व्हावयाचें नाहीं. नळाचें पाणी गांवांत खेळें असूनहि लोकांचें पाण्याचें दुर्भिक्ष्य नाहींसें झालेलें नाहीं मूळचा पाण्याचा पुरवठाच फार थोडा आहे आणि उष्णकाळांत तो इतका संक्षेपांत येतो कीं, प्रत्येक मनुष्य या पाण्याच्या पायीं अगदीं जर्जर होऊन जातो आणि नित्याच्या दिनचर्येला लागणाऱ्या पाण्यासाठीं लोकांस अवांतर खर्च करावा लागतो. नळाच्या पाण्यासाठीं लक्षावधी रुपये खर्च झाला आणि तन्निमित्त झालेलें कर्ज गेल्या दहा वर्षांच्या कालांत अद्याप फिटलें नाहीं. इतक्या खर्चाच्या मानानें पाण्याच्या बाबतींत आह्मी फसलोंच आहों असें म्हणावें लागतें. आणि अशा स्थितींत पाण्या संबंधानें म्युनिसिपालिटीनें नवीन कर बसवावा हें आह्मांस सयुक्तिक दिसत नाहीं. ह्या शिवाय पाण्याचा कर येथील लोकांनीं द्यावयाचा आणि आकोल्यास येणाऱ्या जाणाऱ्या बाहेरच्या लोकांनीं या पाण्याच्या सौख्याचा लाभ घ्यावयाचा आणि या लाभाबद्दल त्यांजवर कांहीं एक खर्च बसूं नये ही गोष्ट सध्यांच्या म्युनिसिपालिटीच्या गरिबीला आवडी बाबडी आहे. पाण्याचा कर हा प्रत्यक्ष प्रत्येक घरवाल्याला जाणवला जाईल; आणि असा जाणवला जाणारा कर देण्याचें सामर्थ्य लोकांपाशीं नाहीं हेंहि आपण विसरता कामा नये.

पाण्याच्या कराच्या मानानें पाहतां जकातीचा कर पुष्कळ पटीनें लोकांना मानवेल असा आमचा तर्क आहे. जकातीच्या करा विरुद्ध मोठा आक्षेप ह्मटला ह्मणजे तो कर वसूल करण्यासाठीं लागणाऱ्या खटाटोपाचा होय. आणि ही गोष्ट आह्मांलाहि नाकबूल नाहीं. परंतु हा बहुत खर्चाचा व त्रासाचा खटाटोप टाळण्यासाठीं जकात बसविण्याची कल्पना त्याज्य आहे असें मोठमोठ्या श्रीमान म्युनिसिपालिट्यांसहि कधीं वाटलें नाहीं. आणि इंडियांतील पुष्कळ प्रसिद्ध शहरांतून हा जकातीचा कायदा अव्याहत अमलांत आलेला आहे. जकातीचा कर हा अगदीं अप्रत्यक्ष कर आहे. त्याचा बोजा ह्मणून कोणावरच फारसा पडत नाहीं. आणि श्रीमंत लोकांची ज्या मानानें आमदानी मोठी असते त्या मानानें त्यांस हा कर अधिक द्यावा लागतो आणि गरीब लोकांच्या व्ययाला अनुसरूनच त्यांच्यावर हा कर अगदीं सौम्यसा पडतो. वसूल करण्याचा त्रास खरा. पण हा कर कोणालाहि प्रत्यक्ष जाणवेल असा नसल्यामुळें तो लोकांना फार सुलभ जातो. आणि अप्रत्यक्ष रीत्या तो वसूल करितांना लोकांचें सामर्थ्यहि अजमावें लागत नाहीं. आणि तसेंच आकोल्या सारख्या धनाढ्य व्यापार पेठेचा जे लोक फायदा घेण्यासाठीं बाहेर गांवाहून येथें येतील त्यांस त्या बहुमोल फायद्याबद्दल जकातीच्या द्वारानें म्युनिसिपालिटीचें ऋण फेडण्याला आपोआप संधी मिळेल. ही गोष्ट या कराच्या स्वरूपा संबंधानें विशेष प्रशंसनीय आहे. या विचारांच्या दृष्टीनें पहातां जकातीचा कर पाणीपट्टी पेक्षां विशेष सुलभ व सुखकर आहे, इतकेंच नाहीं तर त्याचा बोजा श्रीमंतावर व गरिबावर समसमानतेनें पडून कोणासहि कुरकुर करण्यास जागा राहात नाहीं. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन आमची म्युनिसिपालिटी कोणता कर बसविण्याचें ठरवितें हें पाहण्याकडे लोकांचें लक्ष विशेष वेधलें आहे.

## साखरेनें मारणें

प्रसंगानुसार कामक्रोधादि मनोवृत्ती प्रबल होणें हा मनुष्य स्वभावच आहे. पण ह्या मनःप्रवृत्तींनीं आपल्या मर्यादा सोडल्या तर त्या मनुष्याच्या ठायीं महादोषभूत होऊन मनुष्याची जी माणुसकी आहे तिचाच उच्छेद करितात. कामक्रोधादि व्यापार सुव्यवस्थित असणें हें महापुरुषाचें लक्षण होय. साधारणतः सर्व मनुष्यांच्या अंगीं ह्या मनोविकारांचें एक छत्री राज्य चालू असतें. आणि ह्मणून सुविचाराची सत्ता घेणें मनुष्यास फारसें आवडत नाहीं आणि ही गोष्ट त्यास फारच जड जाते. हे कामक्रोध सैरावैरा नांदू लागले ह्मणजे मनुष्य अगदीं बेफाम, व तुच्छ बनून त्यांचा तो दासानुदास होतो. ज्या प्रमाणें पाण्याचा धर्म नीचतर प्रदेशाकडे जाण्याचा आहे तसा मनुष्याचा स्वभावधर्म अनर्गल वृत्तीचा ओघ अमर्याद वाहूं देण्याकडे असतो. आणि अशाच जोरानें वाहत्या पाण्यास धरबंद केव्हां व कसा घातला पाहिजे हें सज्जनांच्याच संगतीनें कळणार आहे. पृथ्वीच्या पाठीवर जी मनुष्ययोनी ह्मणून आहे तिच्यांत थोड्या बहुत प्रमाणानें हे मनोधर्म जरा वाढत्या प्रमाणावर आणि सहज अनिवार होणारे असे असत त आणि त्याच तत्वावर शास्त्रकारांनीं 'कामक्रोध व्यर्वर्जित', असें मनुष्यानें व्हावें ह्मणून लिहून ठेविलें आहे. काम क्रोध विरहित असा मनुष्य विरळा. कामक्रोधांनीं ज्यांचे सर्वांग संव्याप्त झालेलें आहे अशींच मनुष्यें फार आहेत. कामक्रोध हे प्रयत्नानें मिळवावयाचे नसतात तर ते जन्मतःच प्राण्यामध्यें संचरलेले असतात. व त्यांचा जोर दिवसे दिवस जास्त जास्त वाढत जातो अतएव हे कामक्रोध अजिबात नष्ट करण्याचा प्रयत्न करा अशी धर्माज्ञा दिली ह्मणजे ह्या उन्नत प्रयत्नांत हे मनोविकार आपोआप सुव्यवस्थित होतील. ज्या वृत्ती उपजतःच अनिवार आहेत त्यांचें हनन करणें आणि ज्या वृत्ती अंशभूत आहेत त्यांचे उद्दीपन करणें असें द्विविध तत्व शास्त्रकारांनीं आपल्यापुढें मांडलें आहे.

पण आपल्या हिंदुस्थानांतील लोकांचे मनोधर्म इतर राष्ट्रांतील लोकांच्यापेक्षां उलट झालेले दिसतात. दुसऱ्या राष्ट्रांतील लोकांस ज्या गोष्टीमुळें मानहानि वाटते आणि क्रोध चढतो त्याच गोष्टी यांस सन्माननीय वाटून आनंददायी होतात. जे गुणदोष अनिवार आहेत ह्मणून दुसऱ्यांच्या ठिकाणीं त्यांचें हनन करा असें आपण ह्मणतो तेच गुणदोष हिंदुस्थानच्या लोकांमध्यें अंशभूत आहेत तर त्यांचें उद्दीपन होईल अशी योजना केली पाहिजे. हिंदुस्थानच्या लोकांनीं रागद्वेष व्यतिरिक्त न होतां, रागद्वेषासक्त झालें पाहिजे असें वाटूं लागलें आहे. ज्या गोष्टीमुळें मनुष्यानें रागानें त्वेषास चढलें पाहिजे त्या ठिकाणीं आमचे लोक भित्रे व भ्याड होतात. आणि हा दुर्गुण झांकण्यासाठीं आह्मी मोठे क्षमाशील व दयावंत आहों अशी गर्वोक्ती मिरवीत असतात. पण दुर्गुण झांकल्यानें ते दूर होत नाहींत, तर ते उघड करून पाहून व घालवून दिल्यानेंच जाणार आहेत.

दुसऱ्यानें आपणांस छळिलें तरी आपण त्याचा उलट छळ करून सूड न उगवितां त्याजवर उपकार करूनच त्याचा सूड घ्यावा हें फारच उच्चतत्व आहे. पण त्याचा आणि अशाच दुसऱ्या तत्वांचा अतिरेक केला तर तो दोषार्हच होय. 'साखरेनें मनुष्य जितका लवकर मरेल तितका विषानें मरणार नाहीं' हा उपदेश फार गोड आहे. मधुर वाणीनें दुसऱ्यास लाजवावें आणि त्याचे अपराध पोटांत घालावेत ह्मणजे तो अपराधी मेल्याच्याही पलीकडे होतो, पण तेच जर आपण त्यास विष घालून मारण्याचा प्रयत्न केला तर तो साखरेच्या सुरीनें जितका जलद मरेल तितक्या लवकर विषदानानेंहि मरणार नाहीं. पण साखरेची सुरी आपण दुधावरच चालवूं लागलों तर ती सुरी विरून जाईल ह्मणजे अशी सुरी कोठें चालवावयाची व कोठें नाहीं याचा निर्णय ज्याचा त्यानेंच केला पाहिजे.

## आमचे संस्थानिक

सध्यां श्रीमंत गाईकवाड सरकारांची स्वारी कलकत्त्यास गेलेली आहे. तेथें त्यांचा होत असलेला गौरव व बहुमान पाहून मनास

मोठा आनंद व अभिमान वाटतो. श्रीमंतांची योग्यता फार मोठी आहे. त्यांच्या तोडीचा विद्वान् राजा हिंदुस्थानांत नाहीं म्हटल्यास हरकत नाहीं. त्यांचें सौजन्य व त्यांचें औदार्य हीं सुप्रसिद्ध आहेत. ते चार देश हिंडलेले असून मोठे बहुश्रुत आहेत. प्रजेच्या कल्याणा विषयीं ते फार दक्ष असतात. हिंदुस्थानच्या लोकांची व उद्योगधंद्याची उन्नती व्हावी अशी त्यांची इच्छा आहे व त्या धोरणानें त्यांचे प्रयत्न निरंतर चालूच असतात. राजे साहेब हे हिंदुस्थानच्या लोकांचे सर्वतोपरी पुरस्कर्तेच होत आणि अशा राजमान्य व लोकमान्य गुणी पुरुषा मुळेंच हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांचा जुना लौकिक कायम आहे. परंतु दुसऱ्या राजा-कडे पाहिलें म्हणजे मन उद्विग्न झाल्या शिवाय रहात नाहीं.

आमच्या राजेरजवाड्यांची सद्यःस्थिती फार निराळी आहे. पूर्वींच्या राजाप्रमाणें यांच्यापाशीं कर्तुमकर्तुं शक्ती नाहीं. हे नुसते नामधारी राजे आहेत, बाकी सर्व सत्तासूत्रें दुसऱ्याच्याच हातांत असतात. राजांच्या पूर्वींच्या कर्तव्यांत आणि सांप्र-तच्या कर्तव्यांत फार फरक आहे. पूर्वींच्या जुन्या रहाशती व पद्धती यांचा लोप होत चालला आहे. सध्यां राजांना जें शिक्षण दिलें जातें तें मुख्यतः लिहिणें वाचणें व इंग्रजी चालीचे अनंत खेळ खळणें हें होय. राज्यकर्तृत्वाच्या जबा-बदारीचीं कामें त्यांच्या शिरावर मुळींच नसतात. हिंडण्या बागडण्यांतच त्यांचा सर्व काल जातो. त्यांची दिनचर्या म्हणजे खेळांचा प्रोग्राम होय. राज्यकर्तृत्वाची जी शैली व कसब आहे त्याचा यांस गंधहि नसतो. यांस तलवार बहादुरीचें शिक्षण तर निवळ पापाखी असतें. पूर्वीप्रमाणें शूर व योद्धे राजे आपणांमध्यें आतां उरले ना-हींत. सध्यांचें नेमकें शिक्षण आपल्या रा-जांस नको आहे. हिंदुस्थानचें कल्याण कशांत आहे, हिंदुस्थानच्या उद्योगकला उर्जित कशा होतील, व हिंदुस्थान देश सुसंपन्न कशानें होईल याकडे त्यांचें लक्ष्य लागलें पाहिजे. आपल्या पूर्ववैभवश्रींचें स्मरण होऊन सध्यांच्या दीनहीन अवस्थे बद्दल त्यांचें अंतःकरण कळकळलें पाहिजे. आपल्या लोकांबद्दल व आपल्या राष्ट्रा-बद्दल आपलेपणा म्हणून जो कांहीं आहे तो त्यांस वाटला पाहिजे. आपल्या पूर्वजांनीं राज्य कसें मिळविलें, त्यांनीं संपत्तीचा व्यय कसा केला, व त्यांनीं प्रजाहिताचीं कोणचीं कामें केलीं यांची पूर्ण ओळख त्यांस असली पाहिजे. पण असे राजे हाताच्या बोटावर मोजतां येतील इतकेहि नसावेत हें आपलें दुर्दैव होय !

## राजनिष्ठेचें मूळ

बंगालकडील विद्याखात्याच्या डायरेक्टर साहेबांनी एक नोटिफिकेशन प्रसिद्ध केलें आहे व त्यांत त्यांनीं मुलांच्या साठीं क्रमिक पुस्तकें लिहिणारांस एक विशेष सूचना केली आहे. त्यांच्यामतें सध्यांच्या क्रमिक पुस्त-कांत राजनिष्ठात्मक चरित्रें पाहिजेत तितकीं नाहींत. मुलांच्या अंगीं राजनिष्ठेचें बीजारोपण चांगलें होण्यासाठीं राजनिष्ठेमध्यें ज्यांचें सर्व आयुष्य गेलें अशा थोर लोकांच्या चरित्रांचे पुष्कळसे धडे पुस्तकांत मुद्दाम घालावेत म्ह-णजे अशा पुस्तकांच्या वाचनानें मुलांच्या अंगीं राजनिष्ठा चांगली भिनेल. डायरेक्टर साहेबांची सूचना लक्ष्यांत ठेवून मुंबईकडील क्रमिक पुस्तकांमध्यें हाहि नवीन फरक कर-ण्यांत आल्यास नकळे ! थोर थोर लोकांचीं चरित्रें मुलांच्यापुढें मांडल्या पासून त्यांचें अनुकरण करण्याकडे त्यांची प्रवृत्ती वळेल ही गोष्ट निर्विवाद आहे. सध्याच्या पुस्तकांत जीं इतिहासप्रसिद्ध पुरुष्यांचीं चरित्रें आहेत तीं राजनिष्ठा शिकविण्यास पुरेशीं नाहींत असा साहेबांचा अभिप्राय पडतो. परंतु रा-जनिष्ठा हा गुण कायदा पास केल्यानें किंवा राजनिष्ठेचे धडे पुस्तकांतून घातल्यानें उत्पन्न होत नाहीं. प्रजेच्या ठायीं राजनिष्ठा उत्पन्न होण्यास राजानें प्रजानिष्ठ झालें पाहिजे. राजा जर प्रजेवर प्रेम करील तर प्रजाहि त्याजवर प्रेम करील. प्रेमानेंच प्रेम दृढतर होत जातें. राजानें प्रजेच्या सुखदुःखाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष्य करून प्रजेनें राजनिष्ठ असावें अशी इच्छा करणें मोठी चूक होय. हिंदुस्थानांत राजनिष्ठा म्हटली म्हणजे स्वदे-श प्रीतीचा अपाहार होतो अशी कल्पना आहे. जणु काय राजनिष्ठा आणि देशप्रीती ह्या दोन गोष्टी परस्पर विरुद्ध होत. राज-निष्ठा म्हणजे कांहीं अंधळें प्रेम नव्हे. जे राजे गुणज्ञ व प्रजाहितकदक्ष असतील त्यांच्याच ठायीं प्रजाजनांचा निस्सीम भक्ति भाव दिसून येतो. अशाच राजाच्या प्रजांनीं राजनिष्ठेचें व स्वदेशप्रितीचें उत्कृष्ट उदा-हरणें घालून दिलेलीं इतिहासांत प्रसिद्ध आहे. राजनिष्ठा, देशप्रीति व स्वदेश स्वातंत्र्य हे सर्व शब्द एकाच अर्थाचा बोध करितात हे शब्द परस्पर विरोधी नाहींत. मुलांना, देशावर प्रीति करा-स्वातंत्र्याची आवड धरा, किंवा राजनिष्ट व्हा हें सांगणें म्हणजे एकच पर्याय होय. ज्या वस्तूवर प्रेम करावयाचें ती वस्तु प्रेमार्ह पाहिजे. ती वस्तु प्रेमार्ह असेल तर ती आपल्या गुणानेंच दुसऱ्याचें अंतःकरण आपलेंसें करून टाकील. पण प्रेम कर-ण्यास अयोग्य वस्तु असेल तर मन तिकडे धांव घेणार नाहीं. प्रेम करा किंवा न करणें हें धड्या मागून धडे पाठ केल्यानेंहि होऊं शकत नाहीं. प्रीतीचा प्रेम पान्हा फोडण्यास प्रीतीच एकटी समर्थ आहे.

## समरभूमि

युद्धाचें वर्तमान म्हटलें म्हणजे इतकें चित्ताकर्षक असतें कीं, तें ऐकण्याची मनाची प्रबळ उत्सुकता आणि त्याची होत असलेल्या कामाविशी यांची कल्पना करणें कठीण आहे. ज्या प्रमाणें एखादा विरही जन आपल्या प्राणप्रिय माणसासाठीं नामस्मरणी बेऊन मोठ्या आतुरतेनें त्याची वाट पहात बसतो आणि शेवटीं त्याच्या मनाजोगी वार्ता त्यास न मिळाल्यामुळें त्याच्या मनाची होणारी तळमळ अशी पहावत नाहीं, तद्वत् सध्यांच्या लढाईच्या निःसत्व हकीकतींनीं लोकांच्या मनाचा मोठा विरस होतो. दुरून रणसंग्रामाच्या हकीकती ऐकणाराचें अंतःकरण जर कांहीं लढाईच्या दुःखामुळें विव्हल होत असेल तर तें दुःख हेंच होय. बंदुकीचे आवाज, तोफांचो सरबती, समशेरीची चकमक, मनुष्यांची कत्तल, रणदुंदुभींचे अत्युग्र व भीषण स्वन, शिपायांची बहादरी, योद्ध्यांचें शौर्य, निस्सीम देशभक्ती इत्यादि समर भूमीवरील गोष्टी ऐकल्या म्हणजे मनास अपरिमित आनंद होतो. परंतु जेथें रणां-गणावर उभय पक्षांचे सैन्यभार एकमेका-कडे पहात तटस्थ उभे असतात व कोणीच आपला पाय वर उचलीत नाहीं तव्हां मात्र लढाईस रंग येत नाहीं आणि मनुष्याचें मन एक प्रकारें रागाविष्ट होऊन जातें. स्वभावतःच मनुष्यास प्रथम दर्शनीं लढाईचा विचार आवडत नाहीं व त्यास भावी रणकंदनाची फार भीति वाटत असते. परंतु एकवार लढाईच्या ठिकाणीं त्याच्या चित्तवृत्ती स्थिर झाल्यावर त्याच्या अंगांत एक प्रकारचा अलौकिक संचार होतो. व त्यास तीच लढाई एका अत्युच्च अशा स्थानाला नेणारा रमणीय सोपान पंथ दिसतो.

सध्यांच्या जपानी लढाईचें स्वरूप अ-गदीं सौम्य आहे. रशियाचे लोक आपलें ठाणें धरून बसलें आहेत, तसेंच जपानी लोकहि आपल्या जागच्या जागींच आहेत. उभय पक्षांची तयारी मात्र चालू आहे. मुकडेन येथें लौकरच एक चांगलें रणकंदन होईल असें अनुमान आहे. पोर्ट आरथरचा वेढा चालूच आहे. रशियाच्या लोकांनीं मो-ठ्या शिताफीनें रक्षण केलें आहे. जनरल स्टोसेलनें झारास मुद्दाम कळविलें आहे कीं, मी या किल्ल्याचें रक्षण आणखी बरेच महिने करीन. जपानी लोकांच्या प्रयत्नांत कांहीं कमतरता नाहीं परंतु एकदम लगट करून किल्ला हस्तगत करण्याचें काम त्यांनीं अद्याप मनावर घेतलें नाहींसें दिसतें. रशि-याचें बाल्टिक आरमार येऊन पोहोंचण्या पूर्वीं पोर्ट आरथर हें घेतलेंच पाहिजे असा जपानी सरकारचा बेत दिसतो.

## क्षमा वीरस्य भूषणम्

येथील व्यांकेचे एजंट रा. रा. किनि बरो यांनीं क्रोधवश होऊन जो अत्या-चार केला त्या बद्दल त्यांनीं प्रायश्चित्तद्वारां स्वतांची मानखंडना विशेष करून घेतली. रा. किनिबरो रागीट खरे पण ते स्वभा-वानें सुशील आहेत असें सांगतात आणि म्हणूनच आम्ही ध्वनित केल्याप्रमाणें ते आपल्या लक्ष्मीगृहाच्या सिंहासनाखालीं उतरून विद्यामादरांत गेले व त्यांनीं प्रिंसिपाल साहेबांची व विद्यार्थ्यांची माफी हात जोडून मागितली. अशा शरणागत आलेल्या गृहस्थावर रा. गोखले यांनीं अनुग्रह केला व त्यांच्या विद्यार्थ्यांनीं आपल्या स-द्गुरूचें अनुकरण केलें हें सांगणें म्हणजे अगदींच लौकिक रीतीचें व नीरस वाटेल. म्हणून आम्ही तें कथानक समग्र सांगत न बसतां रा. गोखले यांच्या सात्विकपणाचा व त्यांच्यां क्षमासंपन्न वीरश्रीचा विशेष गौरव करितों. ज्या विद्यार्थ्यांचें घड्याळ फुटलें होतें त्यानें कोर्टामध्यें रा. किनिबरो याजवर फिर्याद केली होती. रा. किनिबरो यांनीं आपसांत समजूत केली व त्यानें आ-पल्या गुरुमूर्तींच्या क्षमाशील वर्तनाचा अनु-वाद केला हें त्यालाहि भूषणावह होय. एकंदरीनें ज्याचा शेवट गोड तें गोड होय.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**— थंडी चांगली पडते, ती इतकी कीं पारा ४६ अंशा पर्यंत उतरतो मध्यंतरी अभ्रें येऊन वारंवार हवामानांत चल विचल होते. साधारणपणें सार्वजनिक आ-रोग्य वाईट नाहीं.

रा. रा. सी. ब्राऊन नांवाचे नवे सि-व्हिलिअन मध्यप्रांताच्या वाट्याला आले असून त्यांची नेमणूक असिस्टंट कमिशनर, वर्ग ३ च्या हुद्यावर उमरावतीला करण्यांत आली आहे.

रा. रा. रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटी कमि-शनर, यांची स्वारी डिसेंबरच्या १ ले तारखे-पासून जिल्ह्यांत फिरण्यासाठीं निघणार आहे. आकोला तालुक्यांतून निघून प्रथम आकोट तालुक्यांत दौरा होणार आहे.

रा. रा. सैफुद्दीनखान लालखान तहशिल-दार, बाळापूर हे बाळापुरास दाखल होतात तोंच त्यांस पुन्हा आफिशिएटींग एक्स्ट्रा आसि. कमिशनर नेमून उमरावतीस बदललें.

आणि वरील नेमणुकी मुळें रा. रा. यशवंत रायभान, नायब तहशिलदार, आकोट यांस पुन्हा बाळापुरास तहशिलदा-रीवर ठेवण्यांत आलें.

येथील तुरुंगांतील आगीच्या प्रकरणाचा निकाल गेल्या बुधवारीं सांगण्यांत आला. गोपाळ विश्वनाथ टोकेकर यांस १० वर्षें सक्त मजुरीची शिक्षा दिली; आणि दुसरे दोन आरोपी हनुमानसिंग व बचुसिंग यांस निर्दोषी ठरवून सोडण्यांत आलें.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥। |
| सोनें २४।- | चांदी ७३॥ |
| ज्वारी ४०-४२ | जवस ७६ |
| गहूं काठे ६०-६२॥ | बनशी ८५-८७॥ |
| सरकी | ५।=॥ |
| मीठ | ३॥। रु. मण |
| चणे | २॥= रु. मण |
| तूप | ९ रु. मण |
| तेल | ४॥ रु. मण |

## वर्तमानसार.

**भ्रांतिकृत चमत्कार**— आपल्या कै० महाराणी व्हिक्टोरिया यांच्याच सारखी अगदीं हुबेहूब एक स्त्री इंग्लंडांत आहे. तिचा रंग, शरीराचा बांधा, वगैरे सर्व गोष्टी अगदीं सारख्या आहेत. महाराणी साहेबांचा जन्म ज्या वर्षीं झाला त्याच वर्षीं हिचा जन्म झाला असून वैधव्यही दोघींना एकाच वर्षी आलें. भाग्य व आयुष्य यांच्या [illegible] झाली.

**साबणाचा पर्वत**— नेव्हेडा परगण्यांत एल्कोजवळच्या पर्वतांत शुद्ध साबणाचा कधीं न संपणारा असा सांठा आहे. वाटेल त्यानें सुरी घेऊन जावें व पाहिजे तेवढा तुकडा कापून आणावा. तो प्रथम जरा मऊ असतो, पण जरा उन्हांत ठेवल्याबरोबर टणक होतो, त्या ठिकाणच्या आगगाड्यांत पाण्याच्या खोलींत हा साबण ठेवण्यांत येत असे. पण ही नवीन चीज ह्मणून उतारू लोक तो कांढीत असत. हें पाहून रेल्वे कंपनीनें बाजारांतला साबणच तेथें ठेवण्याचें सुरू केलें.

**विलक्षण घरटें**— इंग्लंडमधील नॅशनल प्रॉव्हिन्शिअल ब्यांकेची पिकेडिलि येथील शाखेच्या इमारतीचा पुढचा भाग साफसूफ करीत असतां एक खबुतराचें घरटें दृष्टीस पडलें. तें सगळें Hair-Pins केसांत अडकावयाच्या लोखंडी सळयांचें केलेलें होतें. या शेंकडों सळ्या एकत्र गुफून अगदीं चटई बनविली होती. याचा आकार लंब वर्तुळासारखा असून ६॥ ते ८ इंच रुंद होतें. ह्या सगळे प्रकार त्यांत होते. नर व मादी या दोघांनीही ह्या सळ्यांखेरीज दुसरें कांहा जमवायचें नाहीं असा निश्चय केला होता असें दिसतें.

**चमत्कार**— साबुर्डी गांवीं बाजरीचे एका ताटास १०९ कणसें आलीं; व त्यांतून दीडपायली बाजरी निघाली; हा चमत्कार स्वतः डोळ्यांनीं पाहिल्याचें एक गृहस्थ कळवितात.

**खरजेवर उपाय**— पिंपळाचीं व वडाचीं वाळलेलीं पानें जाळून त्यांची समभाग राख गोड्या अथवा खोबरेल तेलांत खलून लावली ह्मणजे खरूज त्वरित बरी होते, असा अनुभविक उपाय आहे.

**नवी युक्ती**— तारायंत्र, टेलिफोन व बिनतारांचे साह्यानें लेख उतरण्याचें यंत्र या तीन यंत्रांचा मिलाफ करून एखाद्या मनुष्याचें पत्र तारेनें वाटेल त्या गांवीं पाठवून तेथें येत तसें अक्षर उतरवावयाचें; एवढेंच नव्हे तर तें लिफाफ्यांत घालून त्यावर शिक्का मारण्याचेंही काम यंत्रानें करावयाचें, अशी युक्ती नेपल्समधील येगोरिओ पान्सा नांवाच्या इंजिनियरानें काढली आहे.

**मुलींची उत्कृष्ट शाळा**—जर्मनीत नेरनबर्ग येथें मुलींची व्यापारी शाळा आहे. यांत मुलींना क्लार्कचें वगैरे काम शिकविण्यांत येतें. त्यांच्या घरच्या वर्तनावर कडक नजर ठेवण्यांत येतें. मुलींना नाटकाला किंवा गाण्याला जाण्याला शाळेंतील शिक्षकाची परवानगी लागते. मुली रोज शाळेंत येतील व त्यांचा पोषाख नेहमीं साधा असेल, अशी पालकांना हमी घ्यावी लागते. मुली घरीं काय पुस्तकें वाचतात यावरही नजर ठेवण्यांत येते. शाळामास्तराच्या परवानगी शिवाय खासगी मास्तराला शिकवावयाची परवानगी नाहीं. असा कडक बंदोबस्त असतो. या शाळेंत तयार झालेल्या मुलींना नोकरी मिळण्यास बिलकूल अडचण पडत नाहीं.

**चित्त्या बरोबर कुस्ती**— एका मनुष्यानें एका मोकळ्या चित्याशीं नागपूरचे गोंडराजे सुलेमानशहा यांचे महालांत कुस्ती करून दाखविली. हा तमाशा पहाण्यास हजारों लोक जमा झाले होते. यवढ्या समाजांत तो चित्ता न बांधतां अगदीं मोकळा सोडलेला होता. तथापि खेळ करणारानें त्याला इतका काबूंत ठेविला होता कीं त्यानें उघड्या अंगानें नाना प्रकारचे खेळ त्या चित्त्याचे हातून करविले. हें काम खरोखरच प्रेक्षणीय होतें. अखेरीस राजेसाहबांनीं त्यास पोशाक व इनाम देऊन खूष केलें.

**नवा नियम**— कोणत्याही नाटक मंडळीनें बडोदे येथें तीन महिन्यांपेक्षां अधिक दिवस राहूं नये आणि त्यांनीं ठराविक फी सरकारांत भरावी असा एक नियम करण्याचें ठरत आहे.

**स्त्रिया कलेक्टर**— ईस्ट इंडियन रेलवेच्या सर्व मुख्य स्टेशनांवरून स्त्रियांच्या सोईकरितां टिकिट कलेक्टरच्या जागीं स्त्रियाच ठेवण्याचें ठरलें आहे.

**अलौकीक घोडा**— जर्मनींत एका गृहस्थाच्या जवळ एक विलक्षण घोडा आहे. तो घोडा गुणाकार, भागाकार, बेरीज, वजाबाकी व साधारण हिशेब वगैरे बिनचूक करून दाखवितो. तसेंच घड्याळ पाहून त्यांत किती वाजले हेंही जमिनीवर पायाचे ठोके मारून त्यास स्पष्ट करून कळवितां येतें.

---

## पोर्टेबल क्यामेरा

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, बारा दहाचा उत्तम, नवीन व पोर्टेबल असा क्यामेरा विकावयाचा आहे ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. इच्छा असल्यास फोटोग्राफीही शिकविली जाईल. तारीख ६ माहे नोव्हेंबर सन १९०४ इ०

पत्ता:— रामजी नारोबा दलाल आकोला (पेठ)

---

नाट्यकला संवर्धक मित्र मंडळी

यांनीं आपला लोकप्रिय झालेला

शनिवार ता. ३ मा. दिसेंबर स. १९०४ चा

## श्री तुकाराम

नाटकाचा प्रयोग धनार

वतनदाराच्या श्री गगवत्युत्सवा करितां

उदार बुद्धीनें दिला आहे.

या करितां सर्वांनीं उदार आश्रय द्यावा.

पंढरीनाथ परशराम खेळकर.

---

## नोटीस

बेशमी कृष्णा वल्लद महादू हिवरे राहणार शेगांव यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, आमचा पुतण्या बहादूर हा गेल्या आषाढांत मरण पावला. त्यामुळें वारसाच्या नात्यानें अह्मी मौजे सवरण ता. खामगांव येथील सर्व्हे नंबर ३८ मधलि समाईकींतील तिसरा हिस्सा, जो हिस्सा बहादू हा मरेपर्यंत आह्माबरोबर वाहात होता, तो आह्मी आपल्या ताब्यांत पूर्वीच घेतला आहे. या शिवाय बहादू जवळील चीजवस्त व नगदी रकम ही सर्व तो मेला तेव्हां तुमच्या घरांतच राहिली. आमच्या ताब्यांत ती जिनगी मागितली असतांना तुह्मी दिली नाहीं सबब या नोटिशीनें कळवितो कीं, त्याच्या सर्व चीजवस्तूंचा आह्मांस पुरा हिशेब द्यावा. असें १९ दिवसांत न कराल तर सरकारांत दावा करून अखेर निकाला पर्यंतच्या खर्चा मुद्दां नुकसान भरून घेतलें जाईल. कळावें. ता. २१ माहे नव्हेंबर सन १९०४ इ०

सह्या

१ हरी वल्लद मुकाजी वऱ्हाटे

१ निंबाजी वल्लद मुकाजी वऱ्हाटे

उभयता राहणार सवरण ता. खामगांव पोस्ट—शेगाव निशाणी रेघ.—

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहिरातीनें कळविण्यांत येतें सूर्यभान वल्लद मानसिंग पाटील राहणार पारस यास तारीख २०।६।०२ इ० रोजीं कुलमुखत्यारपत्र लिहून बुक नंबर ४ भाग ८ पान ११६ अ. नं. १७ सन १९०२ याजवर नोंदून वगैरे दिले आहे. ते या जाहिरातीनें रद्द केले आहे. आमच्या त्या मुखत्यारपत्रावरून कोणीही त्याच्याशीं देवघेव करूं नये केल्यास ज्याचा तो जबाबदार राहील कळावें. तारीख २४।११।०४ इ०

सही

भोनाजी जानूजी महार राहणार आकोले दस्तुर खुद

---

## जाहीरखबर

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं पांडु वल्लद गंगाराम तेली रा० पातुर्डा ता० जळगांव (वऱ्हाड) यानें मला आपली इस्टेट म्हणजे पातुर्डा ता० जळगांव येथील खेलभोगक मधील घर व शेत सर्वे नंबर ३९ यांतील निम्मे हिस्सा व बावनबीर ता. जळगांव येथील घर २ व शेत सर्वे नंबर ३० सॉलीम अशी एकंदर इस्टेट त्यानीं मला तारीख २९ माहे आक्टोबर रोजीं बक्षीस पत्र करून नोंदून दिली सबब वर लिहिलेल्या इस्टेटी पैकीं कोणचीहि इस्टेट गहाण, खरेदी, बक्षीस, वगैरे कोणी करून घेऊं नये तसेंच पांडु यानला कर्ज देऊं नये. दिल्यास ज्याचा तो जबाबदार राहील. वरील इस्टेट पांडूच्या बरोबर केलेल्या कोणतेही व्यवहाराबद्दल बिलकूल जबाबदार नाहीं. म्हणून दिली जाहिरात कळावे ता० ३।११।०४ इ.

सही

केशव आणि माधव वल्लद पांडु

अ० पा० करणार मामा

आनंदा वल्लद यादवजी

तेली राहणार आकोला.

---

## नोटीस

रा. रा. जोरावरमल गंगाधर दुकानचा मालक जानकीदास गंगाधर साहू आकोला यांस:—

जयगोपाल विनंती विशेष. तुमची बिन तारखेची नोटीस पोहोंचली तुह्मी आणि मारुती मिळून माझ्या गहाणाचा निकाल करणार होता. तुह्मी केला नाहीं. मी फिर्याद वकीलाकडे दिल्यानंतर तुह्मी ८६० आठशे साठ रुपये घेऊन जाणे विषयीं ह्मणत होते तेव्हां आठशे साठ ८६० रुपयाचा हवाला मी तुमचा घेतला नव्हतां तुह्मी माझ्या गहाणाचा निकाल केला नाहीं ह्मणून मारुतीनें मजला सर्व गहान जिनगी विकली आहे. आणि त्या विक्रीअन्वये मी तुमचे रुपये १४० स व्याज देण्यास तयार आहे. हे रुपये घेऊन पावती द्यावी आणि गहाणखत परत करावे. तसें करण्यास चुकल्यास तुमच्यावर या संबंधाच्यां फिर्यादी अर्यादीची जोखीम राहील आणि माझी इतर नुकसानी भरून घ्यावी लागेल. कळावे ता. २६।११।०४ इ.

सही

नारायण अंबादासजी सोनार

आकोलें द. खु.

---

## नोटीस

रा. रा. जोरावरमल गंगाधर दुकानचा मालक जानकीदास गंगाधर साहू दुकान आकोला यांस:—

जयगोपाळ वि. वि. तुह्मी मला फसवून गहाणखत ता. १६।१०।०४ रोजीं लिहून घेतले आणि माझ्या भावाशीं भांडून ११० रुपयावर निकाल करून देतो असें तुह्मी कबूल केलें आणि दस्तऐवज लिहिणाराकडून तुह्मीच आपल्या मतानें माझ्या सहीची एक नोटीस ता. २२।१०।०४ इ. रोजीं दिली शेवटीं आपसांत निकाल केला नाहीं माझ्या भावास फिर्याद करण्यास लाविलें आणि तुह्मी या रीतीनें फसविल्यामुळें माझी जिनगी कमी किंमतीला मला विकावी लागली. तुमचे रुपये १४० मजकडे आले आहेत ते रुपये तुह्मास सव्याज देण्यासाठीं माझे वडील बंधु रा. रा. नारायण अंबादास याजपाशीं स्वतंत्र ठेविले आहेत ते रुपये घेऊन गहाणखत रद्द केल्या बद्दलचा शेरा देऊन परत करावे तसें न केल्यास रिती प्रमाणें तजवीज करीन.

२ या शिवाय तुह्मी मला फसविल्यामुळें माझी नुकसानी सरासरी ४०० रुपये झाली आहे माझ्या भावानें गहाणाच्या रकमेंत बिलकूल सूट दिली नाहीं तुह्मी भांडण मुद्दाम लावून दिल्यामुळें ही सूट मजला मिळाली नाहीं याशिवाय फिर्याद अर्याद मांडे भाऊ करीत होता त्याला तहकूब करून कमी किंमतीला घर व दुकान विकावें लागलें याची नुकसानी रुपये ४०० तुह्मी आणून पोचते करावे. रिती प्रमाणें रकम न आल्यास तुह्मावर दावा करून नुकसानी भरून घेतली जाईल कळावें हे विनंती.

सही

मारुती अंबादास सोनार राहणार

आकोला द. खु.